www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील  सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 328  मंगळवार दि. 12 ऑगस्ट २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : 6  RNI MAHMAR/2023/89514

# कबुतरखान्यांबद्दल 'सर्वोच्च' निर्णय आला, आता सरकार काय करणार ?

## CM फडणवीसांनी सांगितला पुढचा प्लॅन

मुंबई महापालिकेने कबुतरखान्यांवर घातलेली बंदी मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवली. यासंदर्भात तज्ज्ञांची समिती नेमण्यासही उच्च न्यायालयाने सरकार सांगितले. दरम्यान, या न्यायालयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत हस्तक्षेप करण्यास नकार दिला. कायद्याच्या कचाट्यात सापडलेल्या कबुतरखान्यांच्या संदर्भात आता सरकार काय करणार? अशी चर्चा सुरू झालेली असतानाच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर भूमिका मांडली आहे. पावसाळी अधिवेशनात कबुतरखान्यांचा मुद्दा उपस्थित केला गेला आणि हा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला. आमदारांनी कबुतरखाने बंद करण्याची मागणी केल्यानंतर मुंबई महापालिकेने मुंबईतील कबुतरखाने बंद केले आणि वाद सुरू



झाला. वाद वाढला आणि प्रकरण कायद्याच्या कचाट्यात अडकलं.

**राज्य सरकारचा कबुतरखान्यांबद्दल पुढचा प्लॅन काय?**

सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आणि याचिकाकर्त्यांना पुन्हा उच्च न्यायालयात जाण्याची मुभा दिली.

सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "ठीक आहे. जो न्यायालयाचा आदेश असेल, त्याचे आम्ही पालन करू. आम्ही असाही प्रयत्न करू की, आता काही लोकांचा भावना यात जुळलेल्या आहेत; तर मुंबईतील जो निर्मनुष्य भाग आहे... संजय गांधी राष्ट्रीय उद्यान असेल किंवा अशा भागांमध्ये कुठे जर अशा प्रकारे खाद्य देण्याची व्यवस्था वन विभागाच्या नियमांमध्ये बसवून करता येत असेल, तर त्याचा देखील विचार आपल्याला करता येईल", असे फडणवीस यांनी सांगितले. मुंबई उच्च न्यायलयाने मुंबई महापालिकेचा कबुतरखाने बंद ठेवण्याचा निर्णय योग्य असल्याचे म्हटले होते.

# "ओबीसी लढ्यासाठी अशोकदादा वालमांचा मुख्यमंत्री फडणवीसांकडून गौरव"

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

गोवा दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी गोव्यात पार पडलेल्या राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १०व्या राष्ट्रीय अधिवेशनात बळीराज सेना चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अशोकदादा वालम यांचा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. अधिवेशनात देशभरातील १८ राज्यांतील ओबीसी नेते, कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने, निःस्वार्थीपणे आणि आक्रमकपणे लढा देणाऱ्या अशोकदादांच्या कार्याची देशपातळीवर दखल घेत, त्यांना हा विशेष सन्मान देण्यात आला. सत्कारावेळी बोलताना मा. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "ओबीसी समाजाच्या सक्षमीकरणासाठी अशोकदादांनी केलेले कार्य हे प्रेरणादायी आहे. समाजाच्या हक्कांसाठीची त्यांची बांधिलकी आणि जिद्द ही भावी पिढ्यांसाठी आदर्श आहे." सन्मान सोहळ्यावेळी "जय ओबीसी" च्या घोषणांनी संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले. अनेकांनी हा सन्मान केवळ अशोकदादांचा नसून संपूर्ण ओबीसी समाजाचा विजय असल्याचे नमूद केले. या अधिवेशनात ओबीसी समाजाच्या शैक्षणिक आरक्षण, आर्थिक संधी, राजकीय प्रतिनिधित्व




आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी ठोस धोरणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

अधिवेशनाच्या शेवटी अशोकदादांनी आपल्या भाषणात म्हटले, "हा सन्मान हा माझ्या व्यक्तिगत कार्याचा नाही, तर प्रत्येक ओबीसी बांधवाच्या संघर्षाचा गौरव आहे."

# हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन आणि जारा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन !

## भारत देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त 51 रक्तदात्यांनी केले रक्तदान !

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर:**

भारत देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त 10 ऑगस्ट 2025 रविवारी रोजी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन आणि जारा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमानाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे रक्तदान शिबीर न्यू बायजीपुरा कॉर्नर, सेंट्रल नाका रोड, अलहुदा मुलीची माध्यमिक शाळेच्या बिल्डिंगमध्ये सकाळी 10 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत सुरू होते. भारत देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देशासाठी समर्पित हा भव्य रक्तदान शिबीर ठेवण्यात आले होते. शिबिरात 51 रक्तदात्यांनी रक्तदान केले. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे या सर्व रक्तदात्यांचे आभार मानत सर्वांना पेन गिफ्ट करण्यात आलें. रक्त संकलनाचे कार्य संजीवनी रक्त केंद्राच्या सर्व टिमने केले. संजीवनी रक्त केंद्राच्या सर्व टीमला ही हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे पेन गिफ्ट करण्यात आले. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर व इतर सहकाऱ्यांनी आणि जारा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जावीद मुकीम पटेल व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




# शिवसेनेचा इतिहास संघर्षाचा आहे- तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे

## "तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते किर्ला व महोदरितांडा शिवसेना शाखांचे भव्य उद्‌घाटन – शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य"

**दैनिक युवक आधार**
**नामदेव मंडपे मंठा प्रतिनिधी:**

तालुक्यातील शिवसैनिकांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. किर्ला व महोदरितांडा येथे नव्याने उभारलेल्या शिवसेना शाखांचे भव्य उद्‌घाटन शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यमंत्री अर्जुन खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, व शिवसेना नेते प्रल्हादराव बोराडे यांच्या सर्वसमावेशक मार्गदर्शनाखाली पार पडले. कार्यक्रमास आध्यक्ष मा सभापती संतोषराव वरकड,तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपसभापती किसनराव मोरे,तुलशीराम कुहीरे हे होते ,या वेळी उपस्थित युवासेना उपजिल्हाप्रमुख योगेश गंणगे,उप तालुका प्रमुख रामराव वरकड,अक्षयदिप वाघमारे,बालासाहेब देशमुख,भिमराव वाघ,विलासराव राठोड,उप शहर प्रमुख अमोल विरकर,सचीन गायकवाड,फिरोज पठान,अजय खंदारे,दादाराव खंदारे,अजय गायकवाड,यांची विशेष उपस्थिती होती. उद्‌घाटन सोहळा पारंपरिक वाजत-गाजत, ढोल-ताशांच्या गजरात, भगवे झेंडे फडकवत उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. कार्यकर्त्यांनी "जय शिवराय", "हर हर महादेव" आणि " एकनाथ भाई शिंदे तुम आगे बढो" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. शाखांचा उद्‌घाटनप्रसंगी बोलताना उदयसिंह बोराडे म्हणाले,"शिवसेना ही केवळ राजकीय पक्ष नाही, तर ती एक विचारधारा आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि आपल्या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही ग्रामीण भागातील जनतेसाठी लढा देत आहोत. आज या किर्ला व महोदरितांडा शाखांचे उद्‌घाटन म्हणजे



केवळ इमारत उभारणे नाही, तर गावागावात शिवसेनेचा किल्ला भक्कम करणे आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने गावातील जनतेच्या समस्या आपल्याच घरच्या समस्यांप्रमाणे सोडवाव्यात, लोकांच्या अडचणींना न्याय मिळवून द्यावा, हाच खरा आपला उद्देश आहे.

"शिवसेनेचा इतिहास संघर्षाचा आहे, त्यात कोणतेही बलिदान देण्यास आम्ही कधीही मागेपुढे पाहिले नाही. आमच्यासमोर काहीही अडथळे आले तरी, शिवसैनिक डगमगणार नाहीत. गावोगाव आपली संघटना सक्षम करण्यासाठी आपण सर्वांनी एकदिलाने काम केले पाहिजे. पुढील काळात मंठा तालुक्यातील प्रत्येक गावात भगवा झेंडा फडकवून राहील, ही माझी खात्री आहे

# परभणी येथे शिवसेना पदाधिकारी बैठक व भव्य पक्ष प्रवेश सोहळा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला.

दैनिक युवक आधार
संतोष रासवे
जालना प्रतिनिधी



परभणी – आज परभणी येथे शिवसेना पक्ष पदाधिकारी बैठक तसेच भव्य पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या आदेशाने हा कार्यक्रम पार पडला असून, या कार्यक्रमास अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत असंख्य महिलांसह तरुणांनी मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी पक्ष प्रवेश करणाऱ्या नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी त्यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या ठिकाणी शिवसैनिकांची प्रचंड गर्दी झाल्याने पक्ष प्रवेश सोहळ्याला भव्य सभेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

बैठकीदरम्यान आणि भाषणातून आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शिवसेनेच्या विचारधारेवर प्रकाश टाकत आगामी राजकीय वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. या वेळी अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी कार्यकर्त्यांना भावनिक आवाहन करत म्हटले की, "शिवसेना पक्ष हा सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी आहे. आपण प्रत्येक घराघरात पोहोचून जनतेच्या समस्या सोडवू, त्यांच्या सुखा दुःखात सोबत उभे आहोत. येणाऱ्या काळात परभणी महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा निश्चितच फडकवू."

या कार्यक्रमात मा.खासदार सुरेश जाधव, मा.आमदार, हरिभाऊ काका लहाने, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम, शिवसेना जिल्हाप्रमुख राजू कापसे, माणिक पोंढे, बाळासाहेब पानपट्टे, होंगे पाटील, प्रभाकर कदम केशवराव कदम गीता सूर्यवंशी सखुबाई लटपटे प्रवीण देशमुख शीलाताई शेटे कल्पना दळवी प्रकाश फरकंदकर, शेषराव मोहिते, आप्पाराव वावरे, तसेच परभणी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून आलेले शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडीच्या सदस्यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह, जोश आणि एकजुटीने भरलेला हा पक्ष प्रवेश सोहळा परभणीच्या राजकीय इतिहासात लक्षवेधी ठरला.

# जाणीव एक सामाजिक संस्थेचे पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन साजरे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/ प्रतिनिधी**




नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि मदतीसाठी सदैव २४ तास तत्पर असणारे पोलीस बांधव आज रक्षाबंधन या सणाच्या दिवशीसुद्धा आपल्या कर्तव्यावर होते. कर्तव्यावर असतानाही त्यांना सणाचा आनंद मिळावा आणि त्यांच्या हातावर बहिणीने राखी बांधावी, या उद्देशाने पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये जाणीव एक सामाजिक संस्थेच्या महिला पदाधिकारी व सदस्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीनभाई पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार रक्षाबंधन सण साजरा केला. या प्रसंगी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक अभंग, सपोनि सुनील वाघ, सपोनि घेवडेकर, पोलीस उपनिरीक्षक कदम, पोलीस हवालदार परेश म्हात्रे यांच्यासह पोलीस बांधव उपस्थित होते. यावेळी जाणीव एक सामाजिक संस्थेच्या भगिनींनी पोलीस अधिकारी व कर्मचारी बांधवांना राख्या बांधल्या. "बहीण दूर असली तरी आज या रुपात नवीन बहिणी मिळाल्या आणि हातावर राखी आल्याचा आनंद झाला," असा भावनिक प्रतिसाद पोलिसांनी दिला. या कार्यक्रमाला माजी उपमाहापौर चारूशीला घरत, माजी महिला बालकल्याण सभापती नीता माळी, भाजपा शहर उपाध्यक्ष महिला नीता मंजुळे, वॉर्ड अध्यक्ष संजीवनी खिलारे, सदस्य ज्योस्त्ना माळी, तब्बसूम खान, सुवर्णा सर्जेराव, हमीदा परमार, बबिता गुप्ता, प्राजक्ता नलावडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेलमध्ये 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

## भरघोस रक्कमेची पारितोषिके; सर्वोत्कृष्ट भजनी मंडळाला ५१ हजार रुपये बक्षिस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गोरगरिबांचे आधारवड, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने शनिवार दिनांक २३ ऑगस्ट आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास



मंडळाच्या सभागृहात होणारी हि स्पर्धा 'पुरुष खुला गट' आणि 'महिला खुला गट' अशा दोन गटात होणार असून प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट आहे. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्याकरीता व अधिक माहितीसाठी सागर राजे - ९२२४३४४१३६, नारायण बुवा पाटील- ७७१५८३५४२४, उमेश बुवा चौधरी - ९३२४८२४२०५, चंद्रकांत मने ९७६८६५६४८४, विनोद तोडेकर ७०४५८२२५४८, जगदीश म्हात्रे - ९३२६८१२१९६, पुनमताई ठाकूर ७२०८७७६००५, अभिषेक पटवर्धन - ९०२९५८०३४३, पवन राजे - ९२२१०९७३३७, अनिल कोळी - ९१६७४७४५०७, मच्छिंद्र पाटील - ९००४०४८६३० किंवा डॉ. शैलेश वाजेकर ९८६७२९६८५० यांच्याशी संपर्क साधावा तसेच रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# शाळापूर्व तयारी

शिक्षण हा माणसाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. या पायाची पहिली वीट रोवली जाते ती शाळेत प्रवेशाच्या वेळी. मात्र, शाळेतील शिक्षण फलदायी होण्यासाठी मुलाची मानसिक, शारीरिक, बौद्धिक आणि सामाजिक तयारी आवश्यक असते. हीच तयारी म्हणजे शाळापूर्व तयारी. यामुळे मुलाच्या आयुष्यातील पहिली पायरी मजबूत होते आणि त्याला पुढील शिक्षण सोपे, आनंददायी व यशस्वी होते.

**शाळापूर्व तयारीची संकल्पना**

शाळापूर्व तयारी म्हणजे मुलगा किंवा मुलगी शाळेत जाण्यास तयार असणे, म्हणजेच त्याच्याकडे मूलभूत ज्ञान, कौशल्ये, सवयी आणि वृत्ती असणे, ज्यामुळे तो/ती शालेय जीवनाशी सहज जुळवून घेऊ शकते. ही तयारी केवळ शैक्षणिक विषयांची नसून भावनिक, सामाजिक आणि शारीरिक घटकांचाही समावेश करते.

**शाळापूर्व तयारीचे महत्त्व**

1. सुलभ संक्रमण – घरातून शाळेकडे जाण्याचा बदल मुलाला कमी ताणाचा होतो.
2. भयमुक्त वातावरण – शाळेबद्दल उत्सुकता आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो.
3. शिकण्याची सवय – नियमित वेळापत्रक, बसणे, ऐकणे, लिहिणे यांची तयारी होते.
4. समूहात वावरण्याची कला – इतर मुलांशी मैत्री करणे, खेळणे, सहकार्य करणे शिकते.
5. स्वतःच्या गरजा पूर्ण करणे – स्वतः खाणे, कपडे घालणे, शौचालय वापरणे इत्यादी स्वावलंबन येते.
6. भाषिक कौशल्य विकास – शाळेतील अध्यापन समजण्यासाठी आवश्यक शब्दसंग्रह व वाक्यरचना तयार होते.

--

**शाळापूर्व तयारीचे घटक**

1. शारीरिक तयारी
आरोग्य चांगले असणे
उंची व वजन योग्य प्रमाणात असणे
सूक्ष्म हालचालींचे कौशल्य (पेन पकडणे, कापणे, रंगवणे)
स्थूल हालचालींचे कौशल्य (धावणे, उडी मारणे, संतुलन ठेवणे)
दृष्टी आणि श्रवण क्षमता उत्तम असणे
2. बौद्धिक तयारी
आकडे, अक्षरे ओळखणे
कार, रंग, माप ओळखणे
साधे वर्गीकरण व जुळवणी करणे
साधे कोडे किंवा पझल सोडवणे
स्मरणशक्ती व एकाग्रता विकसित असणे
3. भाषिक तयारी
पले नाव सांगणे, पत्ता सांगणे
साधे प्रश्न-उत्तरे देणे
गोष्टी ऐकणे आणि सांगणे
नवीन शब्दांचा वापर करणे
संभाषणात योग्य शब्दप्रयोग
4. सामाजिक व भावनिक तयारी
इतरांसोबत खेळणे, वस्तू वाटून घेणे
नियम पाळणे
रडण्याशिवाय पालकांपासून दूर राहणे

पली भावना व्यक्त करणे
साधे वाद न करता सोडवणे
5. सवयी व वर्तन तयारी
वेळेवर उठणे, खाणे, झोपणे



विजय बाबाराव कांगणे (प्रा. प.) जि.प. उच्च प्रा. शाळा, दुधा ता. मंठा

स्वच्छता पाळणे
आपली वस्तू सांभाळणे
वर्गात बसून लक्ष देणे

**शाळापूर्व तयारीचे टप्पे**

1. गर्भधारणेपासून सुरू होणारी तयारी
गर्भावस्थेत आईचे आरोग्य, आहार, मानसिक स्थिती महत्त्वाची
बालकाच्या मेंदूच्या पेशींची वाढ गर्भातच सुरू होते
2. शैशवावस्था (0 ते 3 वर्षे)
प्रेम, सुरक्षितता, जिज्ञासा वाढवणारे वातावरण
भाषिक संवाद, खेळणी, गाणी
3. पूर्वशालेय वय (3 ते 6 वर्षे)
'गणवाडी, बालवाडी, प्ले स्कूलद्वारे औपचारिक व अनौपचारिक शिक्षण
लहानसहान जबाबदाऱ्या देणे
नियम व शिस्त यांची ओळख
4. शाळेत प्रवेशापूर्वीचे अंतिम वर्ष
वाचन, लेखन, अंक मोजणीचे प्राथमिक कौशल्य
सामाजिक सवयींची पुनरावृत्ती
शाळेच्या वातावरणाशी ओळख

पालकांची भूमिका
घरात शिकण्याचे वातावरण निर्माण करणे
मुलाशी संवाद वाढवणे
आरोग्य आणि स्वच्छतेची काळजी घेणे
शाळेबद्दल सकारात्मक बोलणे
भीती किंवा दडपण न देणे
शिक्षकांशी संपर्क ठेवणे

**शिक्षकांची भूमिका**

मुलाचे निरीक्षण व व्यक्तिगत गरजा ओळखणे
शिक्षण पद्धती खेळकर ठेवणे
पालकांना मार्गदर्शन देणे
विविध उपक्रमाद्वारे कौशल्य विकास
प्रत्येक मुलाला प्रोत्साहन देणे

**अडचणी व उपाय**

**अडचणी:**
घरात शैक्षणिक साधनांचा अभाव
भाषेची अडचण
आरोग्य समस्या
पालकांची अज्ञानता किंवा निष्काळजीपणा

**उपाय:**
अंगणवाडी, मोफत पूर्वशिक्षण केंद्र
भाषिक पूल तयार करणारे उपक्रम
आरोग्य तपासणी व उपचार
पालक कार्यशाळा व जनजागृती मोहीम
शाळापूर्व तयारीत तंत्रज्ञानाचा वापर
शैक्षणिक अप्स
डिजिटल गोष्टींची पुस्तके
ऑडिओ-व्हिडिओ माध्यमे
ऑनलाइन पालक मार्गदर्शन

**निष्कर्ष**

शाळापूर्व तयारी ही मुलाच्या शिक्षणातील पहिली व महत्त्वाची पायरी आहे. ही तयारी जितकी सर्वांगीण व समतोल असेल तितका मुलाचा पुढील शालेय प्रवास आनंददायी व यशस्वी ठरतो. पालक, शिक्षक, समाज आणि शासन यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास प्रत्येक बालकाला सशक्त शिक्षणाचा पाया घालता येईल.

---

## सावर्डे विद्यालयाचा रक्षाबंधनाचा अनोखा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या आदेशानुसार "हर घर तिरंगा" उपक्रमांतर्गत स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सह्याद्री शिक्षण संस्था संचलित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावर्डेच्या विद्यार्थिनींनी विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र वारे उपप्राचार्य विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधनाचा एक आगळा-वेगळा उपक्रम राबवला. या उपक्रमात सावर्डे पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रेम, आदर व कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून राख्या बांधण्यात आल्या. तसेच त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून प्रत्येक विद्यार्थिनीने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेला "मानपत्र" भेट म्हणून देण्यात आला. या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक श्री. आबासो पाटील, पोलीस हवालदार कांबळे, गमरे, कमरे मॅडम, सावंत मॅडम यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांना राख्या व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने दादासाहेब पांढरे, रोहित गमरे, अमृत कडगावे उपस्थित होते.

उपक्रमात विद्यार्थिनी श्रावणी राठोड, सुमैया बटे, प्रियंका पवार, भाविका राजेशीर्के, प्राची मोहिते, पूर्वा होडे, दूर्वा कोकाटे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. रक्षाबंधनाच्या या स्नेहबंधनाने पोलीस आणि विद्यार्थिनींमध्ये आत्मीयतेचे नवे नाते जोडले गेले.



## करंजाडे येथे दुर्गा माता मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा संपन्न, मंत्री भरतशेठ गोगावले यांनी घेतले दर्शन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

करंजाडे येथे प.पू. गगनगिरी महाराज व स्व. सदाशिव तुकाराम साबळे यांच्या आशिर्वादाने 8 ऑगस्ट ते 10 ऑगस्ट श्री दुर्गामाता मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी गगनगिरी महाराजांचे शिष्य गणेशगिरी महाराज यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी उपस्थिती दर्शवत दुर्गा मातेचे मनोभावे दर्शन घेतले. असंख्य भाविकांनी दुर्गा मातेला वंदन करत आशीर्वाद घेतले.

करंजाडे येथे स्व.सदाशिव साबळे यांनी प.पू.गगनगिरी महाराज यांच्या आशिर्वादाने दुर्गा मातेचे मंदिर सन 2000 साली उभारले. या मंदिराला 25 वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे हे मंदिर जीर्ण झाले होते. त्यामुळे साबळे परिवाराने या मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे ठरवले. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. 8 ऑगस्ट 2025 रोजी गणेश पूजन, पुण्याह वाचन ई. नामस्मरणाने या कार्यक्रमाची सुरूवात झाली.9 ऑगस्टला होम हवन करण्यात आले. सायंकाळी देवीची दिंडी सोहळा मिरवणूक काढण्यात आली. गावदेवी भजनी भारूड मंडळाचे दिंडी भजन होणार आहे तर रात्री दत्त प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन आयोजित करण्यात आले. रविवार 10 ऑगस्ट रोजी कलशारोहण व प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

गगनगिरी महाराजांचे शिष्य गणेशगिरी महाराज यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून महाआरती करण्यात आली. तर दुपारपासून तीर्थ प्रसाद व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात असंख्य भावीक, मंत्री भरत गोगावले आमदार विक्रांत पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह अनेकांनी उपस्थित राहून दुर्गामातेचे मनोभावे दर्शन घेतले. (



## उरण तालुक्यातील जासई ग्रामपंचायतीची येथील विद्यालयांना गुरूकुल अंतर्गत क्षेत्रभेट !!

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर

रयत शिक्षण संस्थेचे ,श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि .बा .पाटील ज्युनियर कॉलेज जासई या विद्यालयातील इयत्ता ५ वी १० वी गुरुकुल वर्गाची क्षेत्रभेट ग्रामपंचायत जासई येथे दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी देण्यात आली.या भेटीदरम्यान जासई गावचे प्रथम नागरिक श्री संतोष घरत सदस्य आदित्य ग्रामविकास अधिकारी श्री पालकर साहेब शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम, उपमुख्याध्यापक श्री कुटे सर, पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम गाथाडी सर सातवीचे वर्गशिक्षक पाहुणे का सर उपस्थित होते. या भेटीदरम्यान ग्रामविकास अधिकारी श्री पालकर साहेब यांनी ग्रामपंचायतीच्या कार्याची सर्व माहिती विद्यार्थ्यांना करून देताना ग्रामपंचायतीची रचना समजावून सांगितली त्यामध्ये जासई गावचे १७ सदस्य व एक सरपंच अशी रचना सांगितली गावची लोकसंख्या एकूण ९७६९ एवढी आहे हे मुलांना सांगितले. त्याचप्रमाणे गावांमध्ये सहा प्रभाग आहेत हे सांगितले. ग्रामपंचायतचे कारभार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम १ ते ३३३ अधिनियम १ ते१६४ या कलमा नुसार कारभार चालते हे मुलांना सांगितले. तसेच ग्रामपंचायतीची कामे कोणते आहेत, हे सांगत असताना आरोग्याविषयीची निगा राखणे, शिक्षण, दळणवळण, दिवाबत्तीची सोय ही कामे ग्रामपंचायत करते असे मुलांना त्याचप्रमाणे २०३० पर्यंत राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान योजना राबवून अनेक उपक्रम राबवण्यात येणार आहेत .याची माहिती दिली. १) गरिबी मुक्तीआणि उपजीविका










२) आरोग्यदायी गाव
३) बालस्नेही गाव
४) जलसमृद्धी गाव
५) स्वच्छ आणि हरित गाव
६) स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेले गाव
७) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव ८) सुशासन असलेले गाव, करून घ्यायचे आहे या संदर्भात माहिती दिली. हे करत असताना आर्थिक मदत किंवा निधी कुठून उपलब्ध केली जाते हे सांगत असताना ग्रामपंचायतीत असणाऱ्या सर्व घरांना घरपट्टी लावली जाते आणि त्या घरपट्टीतून येणाऱ्या पैशांमधून गावाचा विकास केला जातो हे मुलांना पटवून दिले मुलांना स्वच्छते विषयी महत्त्व पटवून सांगत असताना आपल्यापासून त्याची सुरुवात कशी करावी हे मुलांना पटवून दिले. शेवटी स्वच्छता शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता केली गाथाडी सरांनी आभार मानून भेट संपन्न केली.

## स्वातंत्र्य सैनिक पं.ध.थेपडे विद्यालयात परिवहन समितीची सभा संपन्न

दैनिक युवक आधार
जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील

म जळगाव तालुक्यातील म्हसावद येथे आज दिनांक 11-08-2025 रोजी स्वातंत्र्य सैनिक पं.ध.थेपडे विद्यालय व कै. द्वारकाबाई थेपडे इंग्लिश मीडियम स्कूल यांचे संयुक्त विद्यमाने परिवहन समितीची सभा आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी थेपडे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.पी.डी. चौधरी होते. सभेस नूतन झांबरे मॅडम मोटार वाहन निरीक्षक उपप्रादेशिक कार्यालय जळगाव, कै.द्वारकाबाई थेपडे इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य सौ.संगीता पाटील मॅडम, श्री सोमानी सर व थेपडे माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री.जी.डी. बच्छाव पर्यवेक्षक श्री.के.पी.पाटील सर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री.जी.डी.बच्छाव यांनी सभेचा उद्देश उपस्थित सर्व मान्यवर व वाहनधारकांना स्पष्ट करून दिला. सभेला प्रमुख मार्गदर्शक मोटार वाहन निरीक्षक प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथील नूतन मधुकर झांबरे मॅडम यांनी सर्व वाहन चालक बंधूंना विद्यार्थी सुरक्षिततेचे नियम समजावून गाडीचे सर्व कागदपत्रे अद्यावत असल्याची खात्री करून घेण्याचे मार्गदर्शन करून वाहतुकीच्या नियमांविषयी सखोल माहिती दिली. त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. पी.डी.चौधरी सर यांनी सर्व वाहनधारकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्या गाडीत लाख मोलाची मुलं आहेत याची जाणीव ठेवून आपण वाहतुकीच्या सर्व नियमांचे पालन करून आदरणीय नूतन झांबरे मॅडम यांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन होईल असे आपल्या अध्यक्षीय मनोगतात ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.पी.पी.मगरे यांनी केले. व सभेचे आभार प्रदर्शन श्री. सोमानी सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी यांनी सहकार्य केले.




## क्षिणात नवोपक्रमाचे स्थान

१. प्रस्तावना

शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे आणि व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे मूलभूत साधन आहे. बदलत्या काळानुसार शिक्षणाची स्वरूपे, साधने आणि पद्धती यांत सातत्याने बदल होत असतात. आज विज्ञान व तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे जग 'डिजिटल' झाले आहे आणि शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. पारंपरिक फळा-खडू पद्धतीपासून स्मार्ट बोर्ड, ई-लर्निंग, प्रकल्पाधारित शिक्षण, गेमिफिकेशन यांसारख्या आधुनिक पद्धतीपर्यंतचा प्रवास हा नवोपक्रमाचा परिणाम आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी आणि त्यांना २१व्या शतकातील आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्यास तयार करण्यासाठी शिक्षणात नवोपक्रमाला विशेष स्थान आहे.**२. नवोपक्रमाची संकल्पना**

'नवोपक्रम' म्हणजे नवीन कल्पना, पद्धती किंवा साधनांचा वापर करून विद्यमान प्रक्रियेत सुधारणा घडविणे. शिक्षणात नवोपक्रम म्हणजे शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धतीत नवीन, परिणामकारक आणि विद्यार्थीकेंद्रित बदल घडविणे. उदाहरणार्थ, पारंपरिक वर्गात केवळ शिक्षकाकडून विद्यार्थ्यांकडे ज्ञान हस्तांतरण होत असे; परंतु नवोपक्रमामुळे आता विद्यार्थी स्वतः शिकणारा, शोध घेणारा आणि कृती करणारा बनतो. प्रकल्पाधारित शिक्षण, फ्लिप्ड क्लासरूम, ई-पाठशाळा, व्हर्च्युअल लॅब, मल्टिमीडिया प्रेझेंटेशन हे त्याचे काही प्रकार आहेत.

**३. नवोपक्रमाची गरज**

आज माहितीचा स्फोट झाल्यामुळे ज्ञान सतत बदलत आहे. विद्यार्थ्यांना केवळ पाठांतर नव्हे, तर विचारशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता, संवादकौशल्य, सहकार्यभाव, डिजिटल साक्षरता यांसारखी २१व्या शतकातील कौशल्ये आत्मसात करावी लागतात. ग्रामीण-शहरी शिक्षणातील तफावत, समावेशक शिक्षणाची गरज, जागतिकीकरणाचे परिणाम, नवीन व्यवसायांच्या संधी आणि शाश्वत विकासाची जाणीव या सर्व गोष्टी नवोपक्रमाशिवाय शक्य नाहीत.

४. नवोपक्रमाचे प्रकार

तंत्रज्ञानाधारित नवोपक्रम – स्मार्ट बोर्ड, टॅबलेट, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, व्हर्च्युअल रिॲलिटी, कृत्रिम बुद्धिमत्ता.
अध्यापन पद्धतीतील नवोपक्रम – प्रकल्पाधारित शिक्षण, समस्या सोडवण्याची पद्धत, फ्लिप्ड क्लासरूम.
अभ्यासक्रमातील नवोपक्रम – जीवनकौशल्ये, व्यावसायिक प्रशिक्षण, स्थानिक गरजांनुसार विषय.
मूल्यमापनातील नवोपक्रम – सतत व सर्वांगीण मूल्यमापन (CCE), कौशल्याधारित मूल्यांकन.
समावेशक शिक्षण – अपंग विद्यार्थ्यांसाठी विशेष साधने.
पर्यावरणपूरक शिक्षण – ग्रीन कॅम्पस, निसर्गभ्रमंती.
आंतरशाखीय शिक्षण – विज्ञान, गणित, कला, इतिहास यांचा समन्वय.



**५. नवोपक्रमाचे फायदे**

नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा शिकण्याचा उत्साह वाढतो, जिज्ञासा निर्माण होते, कठीण विषय सुलभ होतात, डिजिटल साक्षरता वाढते आणि सहकार्यभाव दृढ होतो. ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी वाढते, अपंग विद्यार्थ्यांना समान संधी मिळते, परीक्षेचा ताण कमी होतो आणि शिक्षण आनंददायी होते.

६. अंमलबजावणीच्या पद्धती

यशस्वी नवोपक्रमासाठी शिक्षक प्रशिक्षण, डिजिटल सुविधा, स्थानिक संसाधनांचा वापर, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, सतत मूल्यमापन, ऑनलाइन प्लॅटफॉर्म, पालकांचा सहभाग आणि समुदायाचा आधार महत्त्वाचा असतो. शाळांनी स्मार्ट क्लासरूम, ई-लायब्ररी, विज्ञान प्रयोगशाळा यांची सोय करावी.

७. भूमिका शिक्षक – नवीन पद्धती शिकणे, तंत्रज्ञान वापरणे, सर्जनशील वर्ग तयार करणे.
विद्यार्थी – स्वतः शिकण्याची तयारी, प्रश्न विचारणे, गटात काम करणे, डिजिटल साधनांचा योग्य वापर.
पालक – प्रोत्साहन देणे, आवश्यक साधने उपलब्ध करणे, शाळेच्या उपक्रमात सहभाग.
शाळा व प्रशासन – पायाभूत सुविधा, प्रशिक्षण, निधी, प्रयोगांचे मूल्यांकन, धोरणात्मक नियोजन.

**८. यशस्वी उदाहरणे**

भारतामध्ये 'दीक्षा' अप, राष्ट्रीय डिजिटल लायब्ररी, केरलचा IT@ SCHOOL प्रकल्प, महाराष्ट्रातील 'बाला' पद्धती, एकलव्य मॉडेल निवासी शाळा हे उल्लेखनीय आहेत. ग्रामीण भागातील मोबाईल वॅन लायब्ररी, सेवा-शिक्षण प्रकल्प, विज्ञान मेळावे हेही परिणामकारक ठरले आहेत.

**९. आव्हाने**

तंत्रज्ञानाचा अभाव, इंटरनेटची मर्यादा, शिक्षक प्रशिक्षणाची कमतरता, निधी अभाव, ग्रामीण-शहरी तफावत, विद्यार्थ्यांचा डिजिटल दुरुपयोग, स्थानिक भाषेतील साहित्याचा अभाव, प्रशासनिक अडथळे आणि परंपरागत पद्धतींवरील अवलंबित्व ही मोठी आव्हाने आहेत.

सर्व शिक्षकांना डिजिटल प्रशिक्षण, ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा, मोफत डिजिटल साधने, स्थानिक भाषेत साहित्य, पालक-जागरूकता मोहिमा, सरकारी-खासगी सहकार्य, विद्यार्थ्यांसाठी डिजिटल सुरक्षा, नवोपक्रम संशोधन केंद्रे, पारंपरिक व आधुनिकतेचा समन्वय आणि दीर्घकालीन धोरणात्मक नियोजन आवश्यक आहे.

**११. निष्कर्ष**शिक्षणात नवोपक्रम हा केवळ एक पर्याय नसून आजच्या काळाची गरज आहे. पारंपरिक शिक्षणाची चांगली बाजू टिकवून त्यात आधुनिकता आणली पाहिजे. नवोपक्रमामुळे शिक्षण अधिक परिणामकारक, आकर्षक आणि जीवनाशी जोडलेले बनते. विद्यार्थी फक्त माहिती घेणारे न राहता, ती निर्माण करणारे आणि उपयोगात आणणारे होतात. त्यामुळे शिक्षक, विद्यार्थी, पालक, शाळा, प्रशासन आणि समाज यांनी एकत्रितपणे नवोपक्रमांना प्रोत्साहन दिल्यासच ज्ञानसमृद्ध, कौशल्यसंपन्न आणि जबाबदार पिढी तयार होईल.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# पोहायला गेलेला दोघा तरुणांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

ऊसर्ली खुर्द येथील धाकली नदीत पोहण्यासाठी गेलेल्या दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना 10 ऑगस्ट रोजी सायंकाळी घडली. या घटनेची नोंद 11 ऑगस्ट रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

कळंबोली येथे राहणारे सुमित कदम (32) आणि त्याचा मित्र अक्षय देसाई (28) हे त्यांच्या इतर दोन मित्रांसोबत चौघेजण ऊसर्ली खुर्द येथील नदीत पोहण्यासाठी गेले होते. सुमित आणि अक्षय या दोघांना पाण्याचा अंदाज न आल्याने ते दोघेजण या नदीत बुडाले. आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आल्यानंतर त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

# आदिवासी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा; मंगळवारी बससेवेचे लोकार्पण

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आ. प्रशांत ठाकूर, आ महेश बालदी यांची लाभणार उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय जनता पार्टी आणि जे. एम. बक्षी यांच्या संयुक्त विद्यमाने उरण विधानसभा मतदारसंघामधील चौक विभागातील आदिवासी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा सुरू करण्यात येत आहे. या बस सेवेचा लोकार्पण सोहळा मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता मुंबई विधान भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या लोकार्पण सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

हि बस सेवा कलोते मोकाशी ठाकूरवाडी, कलोते खोंडा ठाकूरवाडी, कलोते रयती ठाकूरवाडी या मार्गावर धावणार आहे. या उपक्रमामुळे संबंधित भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी होणारी लांब पायपीट थांबेल आणि त्यांना सुरक्षित, सोयीस्कर व वेळेवर शाळेत पोहोचण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांकरिता महत्वपूर्ण असा हा उपक्रम ठरणार आहे.

# पत्रकार अविनाश कदम यांना वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :मारुती सत्रे**

अहिल्यानगर येथील अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने आयोजित रोझ गोल्ड हॉटेल येथे रविवार दि १० ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय "वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार" २०२५ सोहळ्यात, आष्टी येथील लोकमत/मराठवाडा साथीचे तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष व मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा उपाध्यक्ष अविनाश कदम हे पत्रकार क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत असल्याने त्यांची दखल घेऊन त्यांना आदर्श पत्रकार म्हणून वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, रिल स्टार शिवानी बनकर, अक्टर सचिन चव्हाण, अक्टर अर्जुन अंबेकर, संस्थेचे अध्यक्ष तुषार बोरूडे, सिमा डुकरे यांच्या हस्ते देण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत जाधव यांनी केले तर बहारदार सुत्रसंचालन उत्कृष्ट निवेदिका सिमा डुकरे यांनी केले तर आभार विशाल खिळे यांनी मानले.या कार्यक्रमास नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पिंपळपाडा (घोट) येथे नवीन अंगणवाडीचे उद्घाटन व वृक्षारोपण सोहळा

## दानशूर श्री विनोद दादा पाटील यांच्या पुढाकाराने एक प्रेरणादायी उपक्रम

दैनिक युवक आधार
विठ्ठल वाव्हळे घोट गाव (पिंपळपाडा)*
येथे समाजहितासाठी झटणाऱ्या आणि अनेक सामाजिक उपक्रमांत अग्रभागी असणाऱ्या *श्री विनोद दादा पाटील* यांच्या सौजन्याने व स्वखर्चाने नव्याने उभारलेली अंगणवाडी आज ग्रामस्थांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आली.

या उद्घाटनाचा विशेष योग पनवेलचे कार्यसम्राट व जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे *आमदार मा. श्री प्रशांत दादा ठाकूर* यांच्या ५० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने साधण्यात आला. त्यामुळे या कार्यक्रमाला सामाजिक व प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले.

*कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक श्री विनोद दादा पाटील* होते. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,

> "ही अंगणवाडी केवळ एक इमारत नसून, हे भविष्यातील पिढ्यांच्या शिक्षणाचे केंद्र आहे. लहानग्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवण्यासाठी मी सदैव सज्ज आहे."




**हा उपक्रम घोट गावासाठी अभिमानास्पद असून, समाजातील प्रत्येकाने अशा कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा यातून नक्कीच मिळते.**

या कार्यक्रमात अंगणवाडीच्या परिसरात सौंदर्यीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षारोपण देखील करण्यात आले. लहान मुलांसाठी खेळणी, शिक्षण साहित्य आणि इतर सुविधा अंगणवाडीत पुरवल्या जातील, असे आश्वासन *पाटील* यांनी दिले.

या कार्यक्रमासाठी घोट गावचे *माजी सरपंच श्री हरिदासभाई पाटील, तसेच श्री दिलीप पाटील, श्री गिरीश पाटील, श्री शंतनु पाटील, श्री ज्ञानेश्वर पाटील, श्री वैभव भोईर, श्री लहू पाटील, श्री समीर गोंधळी, श्री चंद्रकांत पाटील, श्री एकनाथ कोळी* व इतर मान्यवर उपस्थित होते.

अंगणवाडीतील शिक्षिका व सेविका, तसेच गावातील स्त्री शक्तीचा भक्कम सहभागही या कार्यक्रमात दिसून आला. लहानग्यांचे हसरे चेहरे आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान कार्यक्रमाच्या यशस्वीतेचे उत्तम प्रतीक ठरले.

कार्यक्रमाचे सुरेख व सुबोध सूत्रसंचालन *श्री अमित लांभाते सर* यांनी केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उपस्थित सर्वांचे आभार *श्री विठ्ठल भाऊ वाव्हळे* यांनी अत्यंत मनापासून व्यक्त केले.

# धान्य वाटप करण्यास मुदतवाढ देण्याची

## स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची मागणी

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**

किनवट,दि.१२:जून, जुलै व ऑगस्ट या तीन महिन्याचे धान्य वितरणास ३१ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ मिळावी, अशी मागणी करणारे निवेदन आज(ता.१२) तालुका पुरवठा अधिकारी निलेश राठोड यांना देण्यात आले.



निवेदनात नमूद केले आहे की,तीन महिन्याचे धान्य एकदाच वाटप करण्याचे शासनाने आदेश दिले होते. परतु, शासकिय धान्य गोदामातून दुकानदारांना माल उशीरा प्राप्त झाल्यामुळे माहे जून, जुलै चे वाटप काही दुकानदारांनी अद्याप केलेले नाही. त्यामुळे तसेच माहे ऑगस्ट चा माल काही दुकानदारांना अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे माहे जून, जुलै व ऑगस्ट या तीन महिन्याचे धान्य वाटप करण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

निवेदनावर स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष सुरेश कोंडीराम कराड, उपाध्यक्ष म. जावेद म. चव्हाण,दत्तात्रय गड्डमवार, प्रदमा व्यंकन्ना आयलेनिवार,सदस्य
रामलु नानाजी तिरनगवार, अर्चना गुट्टे व मिलिंद सर्पे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# क्रोमामध्ये स्वातंत्र्यदिना निमित्त आकर्षक डील्स

## टीव्ही, स्मार्टफोन, घरगुती उपकरणांवर १७ ऑगस्टपर्यंत अतुलनीय ऑफर्स

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले संपादक**

११ ऑगस्ट २०२५: टाटा परिवारातील एक सदस्य, भारतातील पहिले आणि सर्वात विश्वासार्ह ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमाने त्यांचा बहुप्रतिक्षित स्वातंत्र्यदिन सेल जाहीर केला आहे. क्रोमासोबत यंदाचा स्वातंत्र्यदिन खरोखर खास बनवण्यासाठी सज्ज व्हा, कारण इथे विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक्सवर उत्तम डील आणि आतापर्यंतची सर्वात मोठी सूट मिळत आहे. या सेलचा लाभ १७ ऑगस्ट २०२५ पर्यंत घेता येईल. देशभर पसरलेल्या ५६० हून अधिक क्रोमा स्टोअरमध्ये बंपर डील, उत्तम मूल्य, परवडणाऱ्या किमती आणि अतुलनीय श्रेणी उपलब्ध आहे. स्मार्टफोनपासून ते टीव्ही, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन आणि इतर अनेक उत्पादने या सेलमध्ये आहेत. आकर्षक किमतीत सर्वात नवीनतम तंत्रज्ञान अपग्रेड करण्याची उत्तम संधी क्रोमाने आपल्या ग्राहकांना उपलब्ध करवून दिली आहे.

इन्फिनिटी रिटेलच्या प्रवक्त्याने सांगितले की,"या स्वातंत्र्यदिनी, क्रोमाने त्यांच्या आतापर्यंतच्या एका सर्वात मोठ्या सेलची सुरुवात केली आहे, ज्यामध्ये विविध श्रेणींमध्ये ५०% पर्यंत सूट देण्यात येत आहे. या सेलमध्ये एक्सक्लुझिव्ह बँक कॅशबॅक, रोमांचक एक्सचेंज फायदे, शून्य-खर्च ईएमआय पर्याय आणि विशेष विद्यार्थी ऑफर देखील समाविष्ट आहेत. क्रोमाने ग्राहकांना त्यांचे तंत्रज्ञान अपग्रेड करणे आणखी सोपे केले आहे. या ऑफर ५६० हून जास्त क्रोमा स्टोअरमध्ये उपलब्ध आहेत, ज्यामुळे संपूर्ण भारतातील ग्राहकांना सुविधाजनक खरेदीचा अनुभव घेता येईल."




# साकोलीत "व्यापारी संकुल" घोटाळा.?

## प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष यांच्याकडे पुरावे सादर

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा_** सध्या साकोली सेंदूरवाफा शहरातील स्थानिक मुळ निवासींचा व्यापार करण्यासाठी व्यापारी संकुलाचा व बाहेरील लोकांच्या अतोनात अतिक्रमणांचा गंभीर विषय गाजत आहे. त्यातच आता संतापजनक आणि तेवढाच धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. "व्यापारी संकुल साकोली" या नावाने शासकीय जिल्हा परिषद पुस्तकावर सन २०१२ मध्ये हजारोंच्या संख्येने जनतेकडून ५००/- रूपये घेऊन पावती देण्यात आली. मात्र अद्यापही १३ वर्ष लोटूनही व्यापारी संकुलाचा पत्ता नाही. तर ते हजारोंचे सुमारे ५ लाखांहून अधिक रूपये अखेर गेले कुठे.? हा एक नविनच घोटाळा उघडकीस आला आहे. सविस्तर की, सन २०१२ मधे साकोली बाजारपेठेत दूकानांचे गाळे पंजीकरण करून जिल्हा परिषद अंतर्गत "व्यापारी संकुल" करीता एक संकुलाची पुस्तक देत फॉर्म भरण्यात आले. यातील एका पिडीत अर्जदाराच्या कागदपत्रांनुसार त्यांकडून फॉर्म नं. १० ची पावती क्र. ९५४८४२ बीके नं. ९३४९ नुसार ५००/- रू घेतले गेले. यात दि. २४/०५/२०१२ नमुद असून वर जिल्हा परिषद भंडारा व खाली पंचायत समिती असे इंग्रजीत ठळक अक्षरात लिहून आहे. फॉर्ममधे जिल्हा परिषद बांधकाम विभाग अर्जावर आवेदन क्र. ३१ व दि. ०७/०६/२०१२ व जोड पत्रिका, अर्जदाराने पूर्ण रक्कम, हप्ता रक्कम अदा करणे बाबत एरीया १५.४३, चौरस फूट १६६.१२ नुसार ब्लॉक डी-०३ यांची रक्कम ३४२५/- रूपये अंकीत केले आहे. पुस्तकात वर "जिल्हा परिषद भंडारा द्वारा शासकीय मान्यताप्राप्त" व्यापारी संकुल साकोली असे चिन्हीत आहे. यामध्ये आर्कीटेक्ट स्टूडियो ईलेव्हन दिल्ली नागपूर असे नकाशावर नमूद केले आहे. दिलेल्या नकाशायुक्त पुस्तकात मागील बाजूस योजना आरंभ २४ मे २०१२, योजना समाप्त ३१ मे २०१२ व सोडतीची दिनांक १५ जून २०१२ असुन व्यापारी संकुल गुणविशेष मध्ये मोकळ्या बाजारपेठेची संकल्पना, तळमजला व पहिला मजला पकडून २०९ दूकान, ४० फूट रुंद सिमेंट रोड, जलतरण सोय, भोजनालय, सार्वजनिक मुत्रालय असे विविध सुविधा नमूद केले होते. यात खाली माहितीसाठी संपर्क - सार्वजनिक बांधकाम उपविभाग साकोली आणि सार्वजनिक बांधकाम जिल्हा परिषद भंडारा असे छापिल केले आहे. यात ही लघुपुस्तिका आवेदनपत्र ५०० रूपये भरून सा. बा. उपविभाग साकोली तसेच जिल्हा परिषद ( बांधकाम विभाग ) भंडारा येथून प्राप्त करू शकता. सर्व अटी व शर्ती जिल्हा परिषद भंडारा यांकडे राखीव आहेत व विस्थापितांना प्रथम प्राधान्य असे लिहिले होते. सन २०१२ ला साकोली शहरातील सुमारे हजारो फुटपाथ दूकानदारांनी व गरीब व्यापारींनी "व्यापारी संकुल साकोली" यामध्ये दूकान मिळेल याच आशेने प्रत्येकी ५०० रू भरले आहेत. परंतू आज २०१२ पासून चक्क १३ वर्षांपासून ना व्यापारी संकुल बनले, ना त्यांचे भरलेले पैसे परत मिळाले. हा चक्क शासनानेच तर जनतेसोबत ४२० फसवणूकीचा प्रकार तर केला नाही.? अशी पिडीत व्यापारी जनतेत संतापजनक लाट उसळली आहे. मग या जिल्हा परिषद पंचायत समिती छापील स्वरूपात पावतीवर



कोण कोण ५०० रूपये घेऊन गेले.? तो सर्व सुमारे ५ लाखांहून अधिक पैसा अखेर कुणाकडे गेला.? की हे साकोलीचे व्यापारी संकुल एक "पैसे लुटण्याचे" साधन होते अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

सध्या साकोली सेंदूरवाफा शहरात बाहेरच्या धनदांडग्यांचे अतोनात अतिक्रमणे करून त्याला भाड्याने व विकण्याचा व्यवसाय धंदा सुरू आहे. याच गंभीर विषयी हा एक नविनच "व्यापारी संकुल साकोली" घोटाळ्याने जन्म घेतला आहे. आज जनता सोशल मिडियावर प्रतिक्रिया देत आहेत की, मुळ निवासींसोबत अशी फसवणूक केली जाते. दूसरीकडे अतिक्रमण माफीया सर्रासपणे शासकीय भूखंडावर पाच सहा एकाचेच अतिक्रमणे करून त्याचा व्यवसाय धंदा करीत काहींनी लाखो रूपयांत विकल्याची चर्चा सुरू आहे. व आता हा शासनाचाच गोरगरीब व्यापारी जनतेला "व्यापारी संकुल साकोली" नावावर व शासनाचे नाव पुढे करून एकप्रकारे ४२० फसवणूक तर केली नाही. याची सुद्धा उच्चस्तरीय चौकशी करण्याची व ते हजारो जनतेकडून ५०० रूपये प्रमाणे वसुली करणारे कोण कोण.? हे सत्य जनतेसमोर आणने गरजेचे आहे. व अश्या फसवणुकीबाजांवर फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची मागणी जोर धरू

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त क्रांतीकारक भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन

## विविध ठिकाणी कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर**
**दिग्रस तालुका प्रतिनिधी**



जागतिक आदिवासी दिनानिमित्त शहरात आद्य क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांना आदराने अभिवादन करण्यात आले. ग्रामीण भागात कादळी, पेळु, तुपटाकळी, महागाव, डोळबा, झिरपुवाडी, चिरकुटा, बेलोरा , डेहणी, साखरी, आरंभी, हरसुल उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच शहरातील देवनगर, कॉलेज नगर , शिवापूर येथे बिरसा मुंडा चौकात आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर आणि समाजातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. या कार्यक्रमात सेवा निवृत्त नायब तहसीलदार बी. टी कन्नाके , नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक अतुल पंत, कर अधिकारी सुभाष बुरकुले , माजी सभापती सुनीता सातपुते, उपजिल्हा प्रमुख राजकुमार वानखडे, तालुकाध्यक्ष शंकर जाधव, कृऊबा संचालक भिमराव खारोडे, सचिव संतोष सातपुते, आदिवासी एकता परिषद अध्यक्ष दिलीप जवादे, बिरसा क्रांती दलाचे उपाध्यक्ष अनिल पेदोर, सदानंद आठवले, अजय कांबळे , विनोद कोवे, प्रा. विजय चांदेकर, सौरभ पधरे, विनोद नाटकर, आदी अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थितांनी क्रांतीकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचे स्मरण केले. आणि त्यांच्या शौर्य आणि त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वातंत्र्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाला आदराने वंदन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आणि आदिवासी समाजाच्या संस्कृती, इतिहास, आणि योगदानाबद्दल जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये रक्षाबंधन सोहळा साजरा

**दैनिक युवाक आधार**
**कॉलेज कट्टा /आरती सुरवसे**

भारतीय संस्कृतीमध्ये मराठी महिन्यांतील प्रत्येक पौर्णिला महत्व असून प्रत्येक पौर्णिमा थितीचे थेट नातेकोणत्याना कोणत्या सणाबरोबर जोडले गेले आहे. यांतील यातच व्रतवैकल्याने भरभरून सणाची रेलचल असणारा श्रवण महिन्याची पौर्णिमा म्हणजे,जी नारळी पौर्णिमा म्हणून ओळखली जेतेबरोबरीने रक्षाबंधनाचा. हा सणसंपूर्ण देशभरात साजरा केला जातो.उरण तालुकाही त्याला अपवाद नसून तालुक्यातही हा सणमोठया उत्साहात साजरा करण्यात आला हाच धागा पकडून उरण मधील "नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये"अनोखा रक्षाबंधन सोहळा साजराकरण्यात आला.



आज स्कूल मधील सजावटी बरोबरच नियमितपणे स्कूलच्या गणवेशात दिसणारे विद्यार्थी- आणि विद्यार्थिनी रंगीबेरंगी कपडे परिधान करून उपस्थित होते,निमित्त होते स्कूल मध्ये साजरा करण्यात येणाऱ्या. राखीबंधन सोहळ्याचे.

नियमितच्या प्रार्थने नंतर विद्य्लायाच्या प्रिन्सिपॉल सौ.ज्योती मॅडमनी नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनका साजरे करण्यात येते या बाबत महिती सांगून त्याम्हणाल्या वैशाख महिन्यांतील अक्षयतृतीये पासून उसळीखात असणारा समुद्र पुढे श्रावण महिन्यातील पौर्णिमे पासून हळूहळू शांतहोत जातो म्हणून कोळी बांधव समुद्राची पूजा करून त्याला नारळ वाहून नव्या हंगामात मासेमारिचा शुभारंभ करतात. याच दिवसी अनादीकाला पासून चालत आलेला राखी बंधनाचा सोहळाही साजरा केला जातो रक्षाबंधनाच्या अनेक कथा पुराणा पासून इतिहासकला पर्यंत आहेत त्याच प्रमाणे जरी हा सण हिंदूसंस्कृतीत मानला जात असला तरी सर्वधर्मीय त्याचा आदर करतातही वस्तुस्थिती आहे असे सांगून त्यांनी नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या शुभेच्छा विद्यार्थ्यांना व आपल्या सहकारी शिक्षकाना दिल्या.

त्यानंतर स्कूलच्या विद्यार्थिनीनी आपापल्या वर्गातील विद्यार्थ्यांना राखी बांधल्या विद्यार्थ्यांनी यावेळी भेटवस्तू दिल्या,त्यानंतर स्कूलच्या विद्यार्थिनीनी उरण शहराचे सदैव रक्षणकर्ते उरण पोलीसयांच्या कार्यालयात जाऊन उरण पोलीसठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ साहेब व त्यांच्या सहकार्यांना राखी बांधल्या व तुमच्या कर्तव्यदक्षते मुळेच आम्ही सुरक्षित असून शहरात मुक्त संचार करत असल्याची भावना व त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी उपस्थित विद्यार्थिनीना खाउचे वाटप पोलिसांनी केले. त्याच बरोबरच उरण तालुक्यांतील असंख्य बहिणींच्या आरोग्याची काळजी घेणारे इंदिरागांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.बाबासो कलेल व त्यांच्या सहकार्यांना रुग्णालयात जाऊन राखी बांधल्या.अशाप्रकारे नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये रक्षाबंधन सोहळामोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

## "मा. श्री. निलेश दादा कोळसकर यांच्या वाढदिवसानिमित्त 'संस्थापक चषक 2025' रबर बॉल क्रिकेट स्पर्धा डोंबिवलीत उत्साहात रंगली!"

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

क्रिकेटप्रेमींनी जल्लोषात साजरा केलेला एक क्रीडासोहळा! पोलादपूर तालुका क्रीडा असोसिएशन अंतर्गत श्री भैरवनाथ क्रीडा मंडळ, देवळे यांच्या वतीने रविवार, दिनांक 10 ऑगस्ट रोजी डोंबिवली पूर्व येथील डायघर मैदानावर "संस्थापक चषक – 2025" रबर बॉल क्रिकेट स्पर्धा दणदणाटात पार पडली.ही स्पर्धा मा. श्री. निलेश दादा कोळसकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या यशात भर



टाकणारी उपस्थिती होती आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक मा. श्री. राज पार्टे यांची.
स्पर्धेतील विजेते संघ:प्रथम क्रमांक – आई काळकाई नवलाई, पळचील
द्वितीय क्रमांक – आई काळकाई क्रीडा मंडळ, हळदुळे
तृतीय क्रमांक – भैरवनाथ जोगेश्वरी क्रीडा मंडळ, देवळे
विशेष चषक:*उत्कृष्ट फलंदाज चषक,*उत्कृष्ट गोलंदाज चषक, *मालकावीर चषक या सोहळ्याची शान वाढवणाऱ्या मान्यवरांमध्ये युवा सेना मुंबई समन्वयक इम्रान भाई शेख, आवाज महामुंबईचा चॅनलचे संपादक व उत्कर्ष समिती रायगड जिल्हा अध्यक्ष मिलिंद खारपाटील, पत्रकार रमाकांत म्हात्रे, पत्रकार अनंत नारंगीकर,पत्रकार सीताराम कळंबे, आम्ही रायगडकर सेवा प्रतिष्ठान चे शिवाजी पार्टे, उद्योजक संतोष रिंगे, संभाजी पार्टे, किशोर शिंदे, साईभक्त संदिप दादा चव्हाण आदींचा समावेश होता.
या स्पर्धेने संपूर्ण देवळे पंचक्रोशीमध्ये उत्साह, एकोप्याचा आणि अभिमानाचा नवा संचार घडवून आणला. नागरिकांनी भविष्यातही अशाच भव्य क्रीडास्पर्धा व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. क्रिकेटप्रेमींच्या मोठ्या गर्दीत 'संस्थापक चषक 2025' खऱ्या अर्थाने अविस्मरणीय ठरला.

## एस.एस.एच. चांडक इंग्लिश स्कूल मुरुडमध्ये रक्षाबंधन सोहळा उत्साहात



**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी**
**मोहम्मद पिंजारी**

एस.एस.एच. चांडक इंग्लिश स्कूल, मुरुड येथे रक्षाबंधन सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते विद्यार्थिनींनी पारंपरिक पद्धतीने राखी बांधून बंधुत्व, प्रेम आणि जिव्हाळ्याचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनावर भाषणे, कविता तसेच सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले शाळेच्या मुख्याध्यापकांनी रक्षाबंधन हा एकता, स्नेह आणि जबाबदारी जपण्याचा दिवस असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना मानवी मूल्ये जोपासण्याचे आवाहन केले.

## *नोएडा दिल्लीत मुंबईचे सुपुत्र प्रमोद न सूर्यवंशी यांना ७ वा राष्ट्र ैरव प्रतिभा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**

समाज कल्याण फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थाने ७ वा राष्ट्रीय गौरव प्रतिभा पुरस्कार 2025 PIIT कॉलेज नोयडा दिल्लीत स्वतंत्र दिवसाच्या निमित्ताने 10 ऑगस्ट 2025 नोएडा दिल्ली येथील पुरस्काराचे आयोजन करण्यात आले .इथे मुंबईचे सुपुत्र प्रमोद न . सूर्यवंशी यांना राष्ट्र गौरव प्रतिभा सन्मान 2025 प्रदान करण्यात आला.
ही संस्था अनेक समाजीज कार्य करुन ती लोकांपर्यत पोहचत आहे..
या ठिकाणी 70 मान्यवर उपस्थित होते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.
मान्यवर या कार्यक्रमात पाहुणे श्री.बच्चू सिंग, ADM नोएडा ,
स्पेशल पाहुणे श्री. रवींद्र कुमार जॉइंट डायरेक्टर PPAC, मिनिस्टर ऑफ पेट्रोल पंप आणि गॅस GOV. इंडिया यांच्या हस्ते करण्यात आला.
या कार्यक्रमाचे आयोजन प्रो.(डॉ.) भरत सिंह,मुख्य रक्षक, आणि डॉ. जितेन्द्र बच्चन राष्ट्रीय अध्यक्ष संस्था नोएडा दिल्ली यांनी केले होते.हा कार्यक्रम उत्तम संपन्न झाला.







## जागतिक आदिवासी दिनानिमित्त मिलिंद चंदाने मा सदस्य रायते ग्रामपंचायत यांनी दिली जव्हार शाळेला भेट



**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

मिलिंद चंदाने रायते गावांचे समाज सेवक व ग्रामपंचायत माजी सदस्य हे कोणत्या ना कोणत्या ते चर्चेत असतात कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील कोणत्याही कामामध्ये ते पुढें असतात मग दवाखाना असो की गोरगरीबांना मदतीचा हात ज्या मुलांना शाळेत प्रवेश मिळाला नाही तो प्रवेश मिळवून देणे ज्यांना फी भरण्यासाठी पैसे नाही ते कुणीतरी पैसे गोळा करून त्या शाळेत भरणे असे कल्याण तालुक्यातील रायते गावचे ग्रामीण भागामध्ये राहुन आपलीं सेवा ते प्रमाणिक पणाने सेवा पार पाडतात जव्हार आदीवासी शाळा आहे तीथे जाऊन त्यांनी त्या शाळेच्या आवारात जाऊन पाहणी केली आणि त्या शाळेची भिंती दिसत आहे त्यांना थोडेसे डांग डुगी दिसतं आहे ते दुरुस्त करून घ्या त्यांनी तीथलया ग्रामस्थ गावकरी यांना सुचित केले आहे तेथील आदिवासी मुलांच्या संगती त्यांनी आपला संपुर्ण दिवस खेळण्यात त्यांनी आनंद घेतला आहे आणि खरा आनंद हाच आणि खरी संपत्ती आपली हिचं आहे आपल्या सर्वांच्या सहकार्याने जागतिक आदिवासी दिन साजरा केला आहे मिलिंद चंदाने यांनी या आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी धनादेश मध्ये चार हजार पाचशे रुपये देण्यात आले आहे पिंपळोली, नरेश कोळंबे उल्हासनगर, अंकिता कोळंबे प्रिन्सिपॉल वाणी विद्यालय कल्याण राजेश जाधव, जयश्री जाधव विशाखा जाधव पाच्छपूर सोबत कातकरी आदिवासी शाळा मु .बाबरे तालुका जव्हार येथील प्रिन्सिपॉल कपिल सातपुते, व अधीक्षक मॅडम सोबत डॉक्टर वेदिका विजय जाधव बच्छापुर आणि गावकरी ग्रामस्थ यांच्या उपस्थित मध्ये हा कार्यक्रम पार पाडला

## जुगार अड्ड्यावर धाड, 8 जणांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल शहरातील लक्ष्मी वसाहत अविनाश शिंदे यांच्या छताला पत्रे असलेल्या घरामध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पनवेल शहर पोलिसांनी धाड टाकली. यावेळी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या ठिकाणाहून साडेतीन हजार रुपये जप्त केले.

लक्ष्मी वसाहत येथे जुगाराचा अड्डा सुरू असल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दहा ऑगस्ट रोजी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी अविनाश दिगंबर शिंदे (जुगार चालक), नितीन रामभाऊ पारंगे, भीमा अर्जुन कुराडकर, संतोष मारुती साबळे, चेतन विनोद मंजुळे, अनिल लक्ष्मण पवार, कल्पेश रामदास पवार, श्याम डोंगरे (घंटा गाडी कामगार) हे त्या ठिकाणी तेरा पानी पैसे लावून जुगार खेळत असताना मिळून आले. या आठ जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनो आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करा

## सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ यांचे प्रतिपादन

### कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात अकरावी वर्गातील विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

शालेय जीवन संपून विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतात. ह्या वयात ठरविलेले ध्येय , केलेले संकल्प साकार होत असतात. बारावी नंतर करिअरच्या अनेक संधी असल्याने याच काळात विद्यार्थ्यांना स्वतःची स्वप्न, आई-वडिलांच्या इच्छा पूर्ण करण्याची संधी असते. म्हणून विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा. महाविद्यालयातील विविध उपक्रमात सहभाग घेऊन आपले व्यक्तिमत्व घडवावे. असे प्रतिपादन निफाड पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड



येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात अकरावी वर्गाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ शुक्रवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. ह्या प्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे, उपप्राचार्य अभय वडघुले, अरविंद ढवळे , संदीप खांडेकर, धनंजय जाधव, प्रा.प्रवीण शेलार,प्रा मनिषा कोटकर आदी उपस्थित होते.
सोनल फडोळ पुढे म्हणाल्या की सोशल मीडियाचा विद्यार्थ्यांनी वापर टाळावा. जास्तीत जास्त वेळ वाचनात घातला पाहिजे. हे वय भावनिक असते त्यामुळे कुठल्याही भूलथापांना बळी न पडता वाचनामध्ये मन एकाग्र करावे. कुसंगत टाळावी. व्यसनापासून दूर रहावे.असे आवाहन केले. अरविंद ढवळे यांनी सायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन करताना अनोळखी व्हिडिओ कॉल उचलू नयेत कमीत कमी वेळा, मोबाईल डाटा ऑन ठेवावा, फसव्या ऑनलाइन लिंक पासून सावध रहावे. पोलिस मदतीसाठी तत्पर आहेत. आपण तत्काळ पोलिस प्रशासनाची मदत घ्यावी.स्वतःला आणि कुटुंबाला सुरक्षित ठेवावे. असे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे यांनी महाविद्यालयात आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून मराठा विद्या प्रसारक समाज संस्था आणि महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास सांगून महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना अधिक शैक्षणिक सुविधा पुरविण्याकडे प्रशासनाचे लक्ष असेल अशी या प्रसंगी ग्वाही दिली. यावेळी प्रा. प्रवीण शेलार,प्रा श्रीमती मनिषा कोटकर, प्रा सुभाष निंबेकर,प्रा शंकर गायकवाड ,प्रा प्रकाश आहेर ,प्रा चेतन कुंदे,यांनी उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयीन प्रमुख प्रा. अभय वडघुले यांनी केले. अकरावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाब फूल आणि ग्रंथ भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा रोहिणी सुरवाडे यांनी `ले तर आभार श्रीमती रोशनी मोरे यांनी मानले.

## मुखेड - नर्सी रोडवर केलेले अतिक्रमण तात्काळ काढावेत शहर काँग्रेसची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड – मुखेड शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण केलेले पोटगाळे व्यापाऱ्यावर कार्यवाही करून अतिक्रमण काढण्यासाठी उप अभियंता सां.बा.वि.मुखेड यांना काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांनी दिले निवेदन.मुखेड – नर्सी रोड वरील दक्षिण भागातील कृषी उत्पन्न बाजार समिती राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रवेशद्वार ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकापर्यंत मुळ दुकानदारांनी आपल्याच दुकानासमोरील रस्त्यावरील जागा ईतर व्यावसायीकांना पोटभाडे घेऊन फवारणीचे यंत्र दुरुस्ती, मेकॅनिकचे दुकान,हॉटेल्स बसवीले आहेत
ज्यामुळे बाहेर बसलेले अतिक्रमणीत दुकानदार रस्त्याच्या मध्यभागापर्यंत आपले बस्थान स्थापीत केल्यामुळे या भागात रोज एक तरी अपघात किंवा मुलींना छेड काढण्याचे प्रकार पहायला मिळत असुन अतिक्रमण केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन नागरीकांना विविध समस्यांना,गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्यामुळे त्याच भागातील व्यापाऱ्यांनी अतिक्रमण धारक पोट भाडेदारां विरोधात मुळ मालकासह त्यांची तक्रार सा.बा.वि. मुखेड कार्यालयात करुनही आजतागायत कुठलीच कार्यवाही झाली नाही
मुखेड पत्रकार बांधवांनी सुद्धा याठीकाणी होत असलेली गैरसोय पाहता आपल्या वृत्तपत्रातून छापुन आणले तरीही बांधकाम विभाग सुस्त गेंड्याच्या कातडी सारखा कार्यरत असल्याचे दिसुन येते या भागातील मुळ दुकानमालका विरोधात तात्काळ कार्यवाही करून पोटभाडयाने राहणाऱ्या अतिक्रमणीत लोकांना हटवण्यात यावे अशयाचे निवेदन सा.बा.वि. मुखेड यांना देण्यात आले. तात्काळ कार्यवाही न झाल्यास शहर काँग्रेस कमिटी मुखेडच्या वतीने मुखेड बांधकाम विभागासमोर आंदोलन करण्याचा ईशारा शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर
अल्पसंख्यांक काँग्रेस शहराध्यक्ष ईमराण पठाण,काँग्रेस शहर उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रति मा.मुख्य अभियंता सां.बा.वी. कार्यालय,नांदेड,कार्यकारी अभियंता सां.बा.वि.नांदेड,मा. तहसिलदार कार्यालय मुखेड यांना देण्यात आल्या

## वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी निफाड पोलीस ठाणे, नगरपंचायत ,निफाड बस स्थानक येथे अधिकारी कर्मचाऱ्यांना बांधल्या राख्या*

### झाडांनाही राख्या बांधून रक्षाबंधन साजरे



**ैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या इयत्ता सहावीच्या स्काऊट गाईडच्या विद्यार्थिनींनी पोलीस ठाणे ,निफाड नगरपंचायत व निफाड बसस्थानक वाहतूक नियंत्रक कार्यालय येथे अधिकारी कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करताना झाडांनाही राख्या बांधून पर्यावरण पर्यावरण पूरक संदेश देण्याचा प्रयत्न केला वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी.बी गुंजाळ यांच्या संकल्पनेतून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला

निफाड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक गणेश गुरव व पोलीस कर्मचाऱ्यांना राख्या बांधण्यात आल्या निफाड नगरपंचायत येथे निफाड नगरपंचायतचे मुख्याधिकारी धीरज भामरे व अधिकारी ,कर्मचारी तसेच निफाड बसस्थानक येथे लासलगाव आगाराचे सहाय्यक वाहतूक निरीक्षक नितीन बोठे, निफाड बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक एस एस गवळी, त्याचप्रमाणे वाहन, चालक यांना राख्या बांधण्यात आल्या याप्रसंगी स्काऊट गाईड प्रमुख के एस चौधरी ,शिक्षक जी एस पवार , श्रीमती आर एस गायकवाड ,श्रीमती सी व्ही राऊत,साहिल शेख आदी शिक्षकांसह विद्यार्थिनी उपस्थित होत्या

वैनतेय विद्यालयात राखी पौर्णिमा आणि आदिवासी क्रांती दिन साजरा करण्यात आला

वैनतेय विद्यालयामध्ये राखी पौर्णिमेनिमित्त विद्यार्थिनीनी कुंडीतील रोपांना व झाडांनाही राख्या बांधून पर्यावरण पूरक संदेश देण्याचा प्रयत्न केला

याप्रसंगी व्यासपीठावर वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी.बी गुंजाळ , नगरसेवक साहेबराव बर्डे , टी एस तलवारे श्रीमती एस. एन .पटेल, श्रीमती आर. एम. लाहोटी ,श्रीमती एस. एस. कापसे आदी होते

विद्यार्थिनींनी या कुंडीतील रोपांचे औक्षण करून राख्या बांधल्या याप्रसंगी राखी पौर्णिमेनिमित्त तयार करण्यात आलेल्या भित्तिपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले याप्रसंगी बी .बी .गुंजाळ, गणेश कुयटे यांचे भाषण झाले

## भिमाद्री विद्यालयात झाडांना राखी बांधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश, रक्षाबंधन, जागतिक आदिवासी दिन व ऑगस्ट क्रांती दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**कर्जतः- (प्रमोद तरळ)**

तालुक्यातील ऐनाचीवाडी विभाग 'चे ई' येथील झेप प्रतिष्ठानने दत्तक घेतलेले भिमाद्री विद्यालय येथे पर्यावरण संवर्धनासाठी एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी परिसरातील झाडांना राखी बांधून "झाडे जपा – जीवन वाचा" हा महत्त्वपूर्ण संदेश दिला. झाडे ही आपली भावंडे असल्याप्रमाणे त्यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतली.



या निमित्ताने शाळेत रक्षाबंधनासह जागतिक आदिवासी दिन आणि ऑगस्ट क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आदिवासी संस्कृती, परंपरा आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान यावर प्रकाश टाकला. तसेच १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या इतिहासाची माहिती देऊन स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे स्मरण करण्यात आले. मुलांसोबत सामूहिक रक्षाबंधन साजरे करून बहिण-भावाच्या बंधुभावाचे नात्याचे नवीन धडे गिरवले गेले, असे झेप प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास धनवडे यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी कालेकर सर (मुख्याध्यापक), शिगोळे सर, कोर सर, वसईकर सर, हुमणे सर (लिपिक), भाऊ सुरोशे आणि भक्तराज झुगारे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करताना, पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम, बंधुभाव आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# “आता नाही तर कधीच नाही – मुरुडकरांचा रेल्वे संघर्ष पेटला

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी मोहम्मद पिंजारी**

मुरुडसारख्या तब्बल ६० हजार लोकसंख्येच्या शहराला आणि आजूबाजूच्या सुमारे ५० गावांना लांब पल्ल्याच्या गाड्यांचा थांबा नाकारणाऱ्या रेल्वे प्रशासनाविरोधात आता जनआंदोलनाचा बिगुल वाजला आहे. १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मुरुड रेल्वे स्थानकावर ध्वजारोहणानंतर रेल्वे थांबा संघर्ष समिती आंदोलन' छेडणार आहे

संघर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. हनुमानदास चांडक यांनी जाहीर इशारा देत सांगितले

थांबा का आवश्यक?

मुरुड आणि परिसरातील प्रवाशांना लातूर वा धाराशिवला जाण्याची गरज उरणार नाही. प्रवास जलद, सुरक्षित व सोयीस्कर होईल. व्यापाऱ्यांना मोठ्या बाजारपेठांपर्यंत सहज पोहोचता येईल. प्रवास खर्चात बचत होईल, ऑटोचालकांना रोजगार मिळेल, स्थानिक हॉटेल, लॉज व लहान व्यावसायिकांना नवी बाजारपेठ मिळेल. साखर, गूळ, पावडर कारखान्यांना वाहतुकीची सुविधा मिळेल, तसेच मोठ्या शहरांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा




प्रवास सुलभ होईल. उद्योगांना कच्चा माल सहज उपलब्ध होईल.

वीस वर्षांचा ‘दर्जा घसरणी’चा प्रवास

नॅरोगेज काळात मुरुड हे ‘बी’ दर्जाचे स्थानक होते. ब्रॉडगेज झाल्यानंतर कोणतेही कारण न देता दर्जा ‘डी’ करण्यात आला आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांचा थांबा बंद झाला. आजवर रेल्वे प्रशासनाकडे याबाबत ठोस कारण नाही

कोरोनापूर्वी मुंबई गाडीला प्रायोगिक तत्त्वावर मुरुडला थांबा मिळाला होता. प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळूनही कोरोना निमित्ताने थांबा बंद झाला आणि पुन्हा सुरू झाला नाही.

दररोजची हजारो लोकांची गैरसोय

मुंबई, पुणे, नांदेड, निजामाबादसारख्या गाड्या मुरुडला थांबल्या तर हजारो लोकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचतील. सध्या मात्र महागड्या ट्रॅव्हल्स हा एकमेव पर्याय आहे

१५ ऑगस्ट – संघर्षाची नांदी

संघर्ष समितीने ठाम भूमिका घेतली आहे

या आंदोलनासाठी विष्णू टेकाळे, सरपंच हनुमंत नागटिळक, डॉ. आर. बी. बाहेती, सिद्धेश्वर मुंबरे, माणिकराव रोहिले यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत

कार्यक्रमाच्या यशासाठी अंकुश नाडे, लक्ष्मीकांत तवले, महेश कणसे, बी एन डोंगरे, मुकेश सवासे, शरीफ सय्यद, शब्बीर सय्यद, सुशील सवासे, प्रशांत पिंपरे, दिलीप इटकर, विकास कापसे, सुरज कांबळे दत्ता गोरे इ. यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

कॉलम /1

मुरुडकरांना विनंती येणाऱ्या 15 ऑगस्ट रोजी, ध्वजारोहणासाठी आपली आस्थापने बंद ठेवून मुरुड रेल्वे स्टेशन येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. हे आवाहन मुरुडकरांवर झालेल्या अन्यायाची जाणीव शासन व प्रशासनाला करून देण्यासाठी करण्यात येत आहे.

**– रेल्वे थांबा संघर्ष समिती**
**समन्वयक : शरीफ सय्यद**

कॉलम/2

मुरुडकरांवरील अन्यायाविरोधात माध्यमांना आवाहन मुरुडकरांवर झालेल्या अन्यायाविरोधात शासन व प्रशासनाला जागे करण्यासाठी सर्व सोशल मीडिया, डिजिटल मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रतिनिधींनी आपल्या उपस्थितीने आंदोलनाला पाठिंबा द्यावा. आपली उपस्थिती शासन व प्रशासनापर्यंत हा आवाज पोहोचवण्यासाठी महत्त्वाची ठरेल.

**– रेल्वे थांबा संघर्ष समिती समन्वयक (ग्रामीण पत्रकार संघ)**
**दत्ता गोरे**

## पदभार स्वीकारल्यापासून संस्थेची यशस्वी वाटचाल - चेअरमन सुशील निंबाळकर

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

सणसर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड सणसर या संस्थेचा दिनांक 27 जून 2024 रोजी चेअरमन पदाचा पदभार स्वीकारल्या पासून पाठीमागील वर्षी मार्च 2024 संस्थेचा तोटा 1 कोटी 40 लाख रुपये एवढा होता..मार्च 2025 अखेर चालू वर्षांमध्ये संस्थेस रक्कम रुपये 16 लाख 9 हजार नफा झाला असून या नफ्यामधून मागील वर्षाचा तोटा वजा करण्यात आला आहे.. मार्च 2024 संस्थेची बँक स्तरावर वसुली चालू वर्षी मार्च 2025 ला 76% पर्यंत आणण्याचे काम केले त्याचप्रमाणे जून 2024 सालची संस्था वसूल टक्केवारी 46% होती.. ती देखील यावर्षी जून 2025 रोजी 48% झाली आहे..लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या कार्यकाळामध्ये कर्जमाफी होईल या अपेक्षा वरती सभासदांनी कर्ज भरण्याकडे पाठ फिरवली आहे.परिणामी संस्थांची थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढत चालली असून याचाच राज्यातील सर्व सहकारी सोसायट्यांना मोठ्या प्रमाणात बसला आहे.. मागील दोन वर्षात संस्थेची सलग अधोगती वाटचाल चालू होती.. ती या वर्षात आम्ही थकबाकीदार सभासदांशी थेट संपर्क साधून त्यांच्याशी चर्चा करून त्यांची वसुली करून नव्याने कर्ज वाटप त्यांना देऊ केले.. याकरता काही सभासदांनी आम्हाला चांगल्या प्रकारे सहकार्य देखील केले.. जी खाती वर्षानुवर्ष थकबाकी मध्ये होती त्यांचा वसूल कसा आणता येईल यासाठी आम्ही सर्वोत्परी प्रयत्नशील राहिलो... छत्रपती कारखाना तसेच इतर बाहेर गावच्या कारखान्यांशी पत्र व्यवहार करून त्यांच्याशी संपर्क करून त्या ठिकाण जाऊन बँकेचे विकास अधिकारी वसुली अधिकारी यांचे सहकार्याने वसूल आणण्यास आम्ही यशस्वी ठरलो.याचाच परिणाम मागील दोन वर्षाच्या परिस्थितीपेक्षा यावर्षी संस्थेची प्रगती बऱ्यापैकी सुधारलेली दिसते.आज संस्थेचे भाग भांडवल 1 कोटी 77 लाख असून सभासद कर्ज 13 कोटी 82 लाख व बँक कर्ज 12 कोटी 85 लाख आहे.. तसेच बँक कायम ठेव 75 लाख, बँक भाग 53 लाख 52 हजार, इतर संस्था भाग ५१ हजार, राखीव निधी 74 लाख 58 हजार, लाभांश निधी 21 हजार, इमारत निधी 2 लाख 34 हजार, असून सभासद एनपीए तरतूद 1 कोटी 35 लाख 81 हजार, चालू वर्षी आपणास करावी लागली आहे.. ती देखील कमी करण्यासाठी व संस्था 100% करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून संस्था चांगल्या प्रकारे नफ्यामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. साधारण 165 थकबाकीदार सभासदांच्या सातबारावरती जप्ती आदेश बोजा नोंद करून पुढील कारवाई चालू आहे.तरी या माध्यमातून आम्ही सभासदांना विनंती करत आहोत की वसुलीसाठी सहकार्य करावे आपण संस्थेस चांगले दिवस आणण्यास सहकार्य करावे असे आव्हान चेअरमन सुशील निंबाळकर यांनी केले यावेळी संस्थेचे सचिव संजय सपकळ, तुषार निंबाळकर उपस्थित होते..



## ट्रकमधील लाखो रुपये किमतीचा माल चोरणाऱ्या दोघा गुन्हेगारांना पनवेल तालुका पोलिसांनी घेतले ताब्यात




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल जवळील मुंबई एक्सप्रेस रोड वर ब्रिज च्या ५०० मिटर अलीकडे ट्रक चालकाला झोप लागल्याने गाडी बाजुला लावून तो झोपला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने लाखो रुपये किमतीचा माल ट्रक च्या आंतमधून चोरुन नेल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी दोघा जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीचा माल हस्तगत केला आहे फिर्यादी प्रविन्द्र सींग ठाकुर, वय-३४ याने याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करताच वपोनि गजानन घाडगे, पोनि (गुन्हे) आनंदा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अनिरुद्ध गिजे , पो उपनिरीक्षक हर्षल राजपूत , पोहवा धुमाळ ,तांडेल ,कुदळे , बाबर , देवरे , म्हारसे ,पोशी भगत , खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी झायेद मुस्तफा फारुकी वय -19 वर्षे व कैस मुस्तफा राईन वय - 19 वर्षे दोन्ही राहणार - तुर्भे स्टोअर झोपडपट्टी, नवी मुंबई येथून ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल फॅब्रिक रोल्स एकुण ३ बॉक्स किंमत २२,००० रुपये ज्यावर बॉक्सवर प्लॅस्टीक कॅरीबॅगने गुंडाळले होते. तसेच त्यावर लाल अक्षरामध्ये FE असे लिहीलेले होते. कॉफी पावडर चे ज्यावर माऊंटन ट्रॉल फूड्स प्राव्हेट लिमिटेड असे लिहीलेले एकुण २५ गोणी व १० बॉकस असे एकुण ३५ बॉक्स किंमत अंदाजे २,६०,००० रुपये. असा एकुण २,८२,००० लाख रुपये किमतीचा माल हस्तगत करण्यात आले आहे .

## पत्रकार दत्ता खंदारे यशवंतराव चव्हाण पुरस्काराने सन्मानित!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

तीन दशकांहून अधिक काळ सामाजिक, विधायक कार्यात अग्रेसर राहणारे आणि लेखणीव्दारे वृत्तपत्रांतून समाजातील व्यथा, वेदना, समस्या आजही सातत्याने मांडत रहाणारे जेष्ठ वृतपत्र लेखक, पत्रकार,साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता श्रावण खंदारे यांना यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनचा यशवंतराव चव्हाण पुरस्कार नामदार भरत नाना पाटील (सदस्य राष्ट्रीय खनिज विकास महामंडळ -भारत सरकार )यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी आमदार विक्रांत दादा पाटील,जेष्ठ पत्रकार विजय चोरमारे बापू, जेष्ठ पत्रकार महेश म्हात्रे आदी मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.

पत्रकार दत्ता खंदारे यांनी गेल्या ३०वर्षाच्या कालावधीत विविध दैनिक, साप्ताहिक आणि मासिका मध्ये सामाजिक प्रश्न मांडून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला.तसेच प्रसिद्ध झालेली कात्रणे संबंधित खात्याकडे पाठवून संबंधित समस्या सोडवण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा केला. आजपर्यंत पत्रकार दत्ता खंदारे यांना पन्नासहून अधिक पुरस्कार मिळाले असून यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव पुरस्कार (इंदौर), राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप, साहित्य रत्न लोकसेवा पुरस्कार, महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार, महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार, महाराष्ट्र संपादक भूषण आणि मुंबई वृत्तपत्र लेखक संघटनेचा जागृत नागरिक आणि पत्रभूषण पुरस्कार, हिंदुस्थान 'बुक ऑफ रेकॉर्ड' पुरस्कार आणि नुकतेच त्यांना कार्यदर्पण पुरस्कारने ही गौरवण्यात होते.दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात भारतरत्न डॉ. बी. आर.आंबेडकर राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. . पत्रकार दत्ता खंदारे




यांना भारतीय दलित साहित्य अकादमी (दिल्ली) चा डॉ.आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप हि प्राप्त झाला असून पुन्हा एकदा यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनचा यशवंतराव चव्हाण पुरस्कार दत्ता खंदारे यांना प्राप्त झाल्याने झाल्याने समाजात विविध स्थरातून त्यांच्यावर अभिनंदनासह कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## तळा तालुका शालेय क्रीडा स्पर्धेची उत्साहात सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत दरवर्षी शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. २०२५-२६ साठी, रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यांमध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, कुस्ती आणि मैदानी खेळ यांसारख्या विविध खेळांच्या स्पर्धाचे दिनांक ११ ते २५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन नायब तहसीलदार जितेंद्र टेंबे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोरघर संस्थेचे अध्यक्ष नाना दळवी, उपाध्यक्ष पांडुरंग माळी, शाळा समितीचे



चेअरमन मोंढे सर, प्रशांत माळी, विस्तार अधिकारी वासकर, केंद्रप्रमुख मनवल, केंद्रप्रमुख पटाईत, गो म वेदक विद्यामंदिर तळाचे मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, बोरघर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका चव्हाण मॅडम, पिटसई हायस्कूलचे मुख्याध्यापक अरुण खुळपे, पढवण हायस्कूलचे मुख्याध्यापक चव्हाण सर, क्रीडा समन्वयक प्रा कसबे पी पी, विनोद लाड आदी मान्यवर उपस्थित होते. क्रीडा ज्योत प्रज्वलन केल्यानंतर समृद्धी मंडलिक या विद्यार्थिनीने क्रीडा ज्योतीचे आगमन केले व खेळाडूंना शपथ दिली. दिनांक ११ ऑगस्ट रोजी सर्व मुलींचे कबड्डी व खो - खो, १२ ऑगस्ट सर्व मुले कबड्डी खो-खो,१३ ऑगस्ट मैदानी स्पर्धा, १८ ऑगस्ट बॅडमिंटन व कुस्ती स्पर्धा, १९ ऑगस्ट बुद्धिबळ व कराटे तर २५ ऑगस्ट २०२५ रोजी कॅरम, हॉलिबॉल आदी स्पर्धा पार पडणार आहेत. या स्पर्धेत तळा हायस्कूल, बोरघर हायस्कूल, पिटसई हायस्कूल, पढवण हायस्कूल, मजगाव हायस्कूल, महागाव हायस्कूल, राजिप तळा, म्हसाडी हायस्कूल, एस एस निकम तळा, उर्दू हायस्कूल तळा, मांदाड हायस्कूल व उसर हायस्कूल या शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. ११ ऑगस्ट रोजी तळा तालुक्यातील सर्व मुलींच्या खो खो व कबड्डी स्पर्धा उत्साहात पार पडल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक कसबे पी पी तर निवेदन शिंदे सर यांनी केले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून प्रकाश ढाकणे, अमरसिंग वसावे, अनिल बाबर, विनोद लाड, मोंढे आशा, शिला गावित, भौड एस जी, पिचड किसन, विनायक महाडकर, बागुल जे. पी, मोहिते एस. एस, मनोहर वारगुडे, बैकर सर, आदी शिक्षक काम पाहत आहेत. यावेळी तळा तालुक्यातील मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## सुरगाणा महाविद्यालयात जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राज्यशास्त्र व इतिहास विभागाच्यामार्फत प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली ९ ऑगस्ट आदिवासी दिन व क्रांती दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते आदिवासी क्रांतिकारक बीरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. सुरेश भोये यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की १९९४ पासून जागतिक आदिवासी दिन साजरा केला जातो आदिवासी संस्कृती, जतन संवर्धनाबरोबरच आदिवासींच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या शासनाच्या योजना,कायदे, हक्क, कर्तव्य अधिकार यांबाबत आदिवासी भागातील खुंटलेला विकास



ह्यासंबंधी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे दुसरे वक्ते प्रा.सुभाष कामडी यांनी सांगितले की आदिवासी समाज मुळातच निसर्गाचा वाचक आहे जल,जमीन जंगल याचे जतन संवर्धन,औषध वनस्पतींचे ज्ञान, मौखिक परंपरेने चालत आलेली लोकगीते,लोककथा यासंबंधी माहिती दिली .

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले ९ आगस्ट १९४२ मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली चले जाव चळवळ उभी राहिली, ग्रामीण भारत खेड्यात वसलेला आहे, खेड्यांचा विकास झाला तर देशाचा विकास होईल असे सांगुन प्रा.अहिरे यांनी डोंगराळ भागात रानावनात दरीखोरीत वास्तव्य करून निसर्गाच्या सानिध्यातील सूक्ष्मज्ञान अवगत करून जीवन जगणाऱ्या आदिवासी बांधवांची संस्कृती नैसर्गिक जीवनमूल्यांवर आधारीत आहे. आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, देवाजी राऊत,तंट्या भील्ल, राणी दुर्गावती ह्या आदिवासी क्रांतिकारकांनी देशासाठी योगदान दिले आहे, आदिवासी भागातील आदिवासी बांधवांच्या विकासासाठी शेती, सिंचन,घर कुल, स्वस्त धान्य, शिक्षण ह्या संदर्भात सवलती दिल्या आहेत पण तळागाळातील जनसामान्यांच्या प्रत्येकापर्यंत रोजगार, सुविधा अजूनही काही ठिकाणी पोहोचल्या नाहीत त्याविषयी आदिवासी बांधवांनी जागृत व्हायला हवे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा केशव गावित यांनी केले तर आभार प्रा. सविता शिरसाट यांनी मानले यावेळी कार्यक्रमाला डॉ.चंद्रकांत पाटील, प्रा. कविता भोये, प्रा. बाळु धुम,प्रा.गुलाब पवार, प्रा. भगवान महाले,प्रा.जोपळे यांच्या बरोबरच कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी घडवतील इतिहास:महेश बालदी

### मोहोपाडा जि.प.शाळेत स्कूल बॅग वाटप; कृष्णाशेठ पारंगे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**रसायनी (आनंद पवार):-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी विद्यार्थिनी ऐतिहासिक इतिहास घडू शकतात असे गौरव्दगार उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा मोहोपाडा येथे व्यक्त केले

वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कृष्णाशेठ पारंगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शुक्रवार दि.८ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहोपाडा येथे शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप आ.बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार महेश बालदी पुढे बोलताना म्हणाले की जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच ऐतिहासिक इतिहास घडवल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कृष्णाशेठ पारंगे यांना तळागाळातील गोरगरीब जनतेविषयी आत्मीयता व आपुलकी असून त्यांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शालेय वस्तूंचे वाटप करत एक अनोखा उपक्रम या निमित्ताने राबवल्याने कृष्णाशेठ पारंगे यांचे आमदार महेश बालदी यांनी कौतुक करत वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्यात यापुढे बोलताना आ.बालदी पुढे म्हणाले की, आम्ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेऊन मोठे झालो आहेत याचा आम्हाला गर्व अभिमान आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये संस्कार शिकवले जातात आणि याच संस्कार रुपी शिक्षणामुळे आदर्श विद्यार्थी घडले असून आज जि.प.शाळेत शिकलेलेअनेक विद्यार्थी आमदार,खासदार मंत्री कलेक्टर अशा उच्च पदावर आहेत याचा गर्व व अभिमान वाटतो. कॉन्मेंट शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी पदव्या घेऊन इंजिनीयर डॉक्टर होतात आणि परदेशात जाऊन नोकरी करतात मात्र काहीजण आपल्या जन्मदात्या आई वडिलांना वृद्धाश्रमात ठेवतात अशी खंत ही आ.बालदी यांनी व्यक्त केली.परंतु जि.प.मराठी शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना गरिबीची व परिस्थितीची जाणीव असल्यामुळे त्यांनी चांगले संस्कार आत्मसात केल्याने सामाजिक,शैक्षणिक, राजकीय,शासकीय वैद्यकीय व क्रीडा अशा विविध उच्च पदावर जावुन जनसामान्यांची सेवा करताना दिसून येतात. कृष्णाशेठ पारंगे हे या परिसराचे नेतृत्व करतात नेतृत्व करत असताना जनसामान्यांची नाळ त्यांना माहीत असल्यामुळे आज त्यांनी वाढदिवसाच्या औचित्य साधून हा स्तुत्य उपक्रम राबवल्याबद्दल आमदार बालदी यांनी त्यांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. याप्रसंगी विविध राजकीय पक्षाचे नेते पदाधिकारी सामाजिक शैक्षणिक,क्रीडा, वैद्यकीय,पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कृष्णाशेठ पारंगे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

# अनेक मंत्र्यांवर गंभीर आरोप होऊनही राजीनामा घेतला जात नाही ही सत्ताधाऱ्यांची हतबलता : जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर

**दैनिक युवक आधार**
**संतोष रासवे जालना प्रतिनिधी**

जालना, प्रतिनिधी (दि.11) राज्यातील कलंकित व वादग्रस्त मंत्र्यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी जालना जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सोमवार रोजी जालना शहरातील महात्मा गांधी चमन येथे आक्रोश व धरणे आंदोलन आयोजित केले.

यावेळी शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांनी प्रचंड घोषणाबाजी करीत मंत्र्यांच्या राजीनामेची मागणी केली.

यावेळी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, मागील अनेक महिन्यांपासून महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळातील काही मंत्री बेजबाबदारपणे वागून वादग्रस्त विधाने करीत आहेत. तर अनेकांचे भ्रष्टाचार उघडकीस आले आहेत. तरीही त्यांचे राजीनामे घेतले जात नाहीत हे अत्यंत दुर्दैवी आहे.

यावेळी जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम, तालुकाप्रमुख हरिहर शिंदे, जयप्रकाश चव्हाण, प्रदीप बोराडे, पंडित गावडे, शहरप्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोटीवाले, दीपक रणनवरे, भारत पंडित, गंगुताई वानखेडे, बाबुराव कायंदे यांची उपस्थिती होती.



पुढे बोलताना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, ज्या गृहमंत्र्यांची डान्सबार बंद करण्याची जबाबदारी आहे तेच डान्सबार चालवत आहेत, कृषी मंत्री शेतकऱ्यांची हेटाळणी करीत आहेत, समाज कल्याण मंत्री समाजाच्या ऐवजी स्वतःचे कल्याण करण्यातच मग्न आहेत, एकीकडे राज्यात अंधश्रद्धे विरोधातील कायदा असताना राज्य मंत्रिमंडळातील मंत्रीच सत्तेसाठी जादूटोणा करत आहेत हे अत्यंत दुर्दैवी चित्र राज्यात दिसत आहे. या राज्याला अत्यंत उच्च दर्जाच्या व सुसंस्कृत राजकारणाची परंपरा आहे.

अत्यंत छोट्या छोट्या आरोपांमुळे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, ए.आर.अंतुले, शिवाजीराव निलंगेकर, तत्कालीन गृहमंत्री आर.आर.पाटील या व्यक्तींना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना तत्कालीन मंत्र्यांवर आरोप झाल्याने त्यांनाही शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पदावरून काढले होते. परंतु आज मात्र अनेक आरोप होऊनही मंत्र्यांचा राजीनामा होत नाही. त्यांचा राजीनामा घेतला जात नाही. यातून सरकारची हतबलता दिसून येते. अशा भ्रष्ट मंत्र्यांचे राजीनामे न झाल्यास हे मंत्री असेच निर्ढावल्यासारखे वागतील. करिता आता जनतेनेच याबाबत विचार करून त्यांना धडा शिकवणे गरजेचे असल्याचे मत शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी व्यक्त केले.

यावेळी उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम, जिल्हासंघटक भानुदास घुगे, तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी युवा सेना शहरप्रमुख दर्शन चौधरी, किशोर नरवडे पंडित क्षीरसागर, जनार्दन गिराम, सुरेश वाघमारे, सखावत पठाण, ऋषिकेश खिरे, अनंता वैद्य, सखाराम घोलप, प्रभाकर उगले, जनार्दन गिराम, सुरेश वाघमारे, विजय बोरुडे, योगेश जाधव, अजय रोडीये, विठ्ठल पाऊलबुद्धे, जीवन खंडागळे, सोनाजी खांडेभराड, राज इंगळे, संतोष क्षत्रिय, गणेश लाहोटी, मदन खरात, पांडुरंग काळे, प्रभाकर ब्राह्मणे, अभिमन्यू खापरे, रजनीश कणके, बाळासाहेब गावडे, जनार्दन रेगुडे, सुनील चौधरी, किरण तुम्मा , तुकाराम भुतेकर, विजय बोरुडे, बळीभाऊ खैरे, बाबासाहेब खांडेभराड, सचिन चव्हाण, दिगंबर बोरुडे, प्रभाकर शिंदे, सर्जेराव कायंदे, मच्छिंद्र शेळके, संदीप राठोड, श्याम चव्हाण, परमेश्वर खैरे, सतीश डूम, अनिल दहिजे, गणेश दराडे, बाळाभाऊ सदावर्ते, राजेंद्र कोटेचा, अनिस पठाण, सादिक मिर्झा, गणेश तरासे, शेख राहील, वसीम पठाण, अब्दुल नईम, गजानन गिराम, सचिन नागरे, कैलास मिसाळ, सादिक मीर्झा, राहिल भाई, सुनील तोडकर, नितिन गुमरे, शेख ईमताज, शेख नईम, अजय रोडिया, सादिक मिर्झा, राहील मणियार, नितीन गमरे, सुनील तोडकर, शेख इम्तियाज आदींची यावेळी उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ संगमेश्वर तालुका अध्यक्षपदी रविंद्र दरडी व सचिवपदी संदेश सावंत यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**देवरुख :- (प्रमोद तरळ)**



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या संगमेश्वर तालुका शाखेची सभा देवरुख येथे जिल्हा उपाध्यक्ष मा. श्री. सुरेंद्र रणसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेत सन २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठी नूतन कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली. यामध्ये श्री. रविंद्र दरडी यांची तालुका अध्यक्षपदी, तर श्री. संदेश सावंत यांची सरचिटणीसपदी बहुमताने निवड झाली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे

कार्याध्यक्ष: श्री. शशिकांत करंडे उपाध्यक्ष: श्री. संजय मोरे, श्री. निलेश तरंगे, कोषाध्यक्ष: श्री. नथुराम पाचकले,
कार्यालयीन चिटणीस: श्री. संजय जाधव,
सहचिटणीस: श्री. आनंदा मोरे, महिला आघाडी प्रमुख: सौ. धनश्री आंबवकर, महिला सदस्य: सौ. सायली सावंत, सौ. नेहा दरडी, सौ. नेहा पाचकले, सौ. वैशाली चव्हाण, सौ. सुलभा जाधव, सौ. तेजस्विनी पाटील, सौ. जयश्री भोजने, सौ. सुरेखा गायकवाड, विभाग प्रमुख: श्री. धनाजी मोटे (साखरपा), श्री. सुदेश मोहिते (कोळंबे बीट), जिल्हा कार्यकारिणी सदस्य: श्री. विलास गुरव, श्री. अंबादास कवितके
सल्लागार: श्री. प्रकाश शिंदे, श्री. दिलीप वाळके, श्री. भानुदास ढेंगळे शिक्षक नेते: श्री. चंद्रकांत बाटे आदींची निवड झाली या निवडीनंतर उपाध्यक्ष श्री. सुरेंद्र रणसे यांनी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच राज्य कार्याध्यक्ष श्री. संतोष कदम, जिल्हाध्यक्ष श्री. अजय गराटे आणि माजी तालुका अध्यक्ष श्री. निकम यांनीही पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय मोरे यांनी केले.

# वाहतूक उल्लंघन करणाऱ्यांना सुरक्षाराखी. उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक

## हेल्मेट परिधान न करणाऱ्यांना क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे सुरक्षाराख

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

सालाबादप्रमाणे यंदाही क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या माध्यमातून रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यंदाचे 8 वे वर्ष असून सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ रुपालीताई शिंदे या विविध कार्यक्रमाचे आयोजन करत असतात, युवा व डेशिंग असे व्यक्तिमत्व सौ.रुपालीताई शिंदे ह्या सामाजिक कार्यात स्वतःला पूर्ण झोकून विविध कार्यक्रम राबवत असतात, महिलांच्या समस्यांना सतत झटणाऱ्या रुपालीताई शिंदे यांनी यावर्षी देखील वाहतूक शाखेचे नियमन न करणाऱ्या व नियम न पाळणाऱ्या दुचाकी, चारचाकी वाहन चालकांना थांबवून त्यांना रक्षाबंधन दिनानिमित्त सुरक्षाराखी बांधून वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करावे असे सांगण्यात येते. भाऊ बहिणीची रक्षा करण्याचे वचन रक्षाबंधन दिवशी दिले जाते त्याचप्रमाणे आम्हा फाउंडेशनच्या महिला नियम न पाळणाऱ्या भावांना राखी बांधून त्यांचे रक्षण व्हावे, त्यांचा प्रवास सुखरूप व्हावा अशी इच्छा व्यक्त करत हा रक्षाबंधनाचा पवित्र सण गेले ८ अवरीत सुरु असलेले क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशन मार्फत साजरा करण्यात आला, त्याच बरोबर वाहतूक विभागाचे कर्तव्यदक्ष अधिकारी हे देखील सणाच्या दिवशी सुट्टी न घेता आपले कर्तव्य बजावत असतात त्यांना देखील सुरक्षाराखी बांधून राखी बांधण्यात आली.



वाहतुकीचे उल्लंघन केल्यानंतर पोलिसांनी पकडल्यानंतर 'तोडपाणी' करणे किंवा त्याच्याशी हुज्जत घालून आपण कसे चूक नाही, हेही पटविण्याचा प्रयत्न करणे नित्याचे आहे मात्र
नियम मोडणाऱ्या चालकांवर लक्ष ठेवण्यासाठी पनवेल शहरातील प्रत्येक मोक्याच्या ठिकाणी अधिकाऱ्यांसमवेत महिला पोलीस तैनात करण्यात आल्या होत्या. या मोहिमेअंतर्गत वाहतुकीचे नियम समजावून माहिती चालकांना देण्यात आली.

क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशन अध्यक्ष रुपालीताई शिंदे यांनी राखी पौर्णिमेचे औचित्य साधत अशा प्रकारे नियम मोडणाऱ्या चालकांना कोणतीही शिक्षा न करता, दंडाची पावती न फाडता वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या अशा चालकांना चक्क राखी बांधून त्यांना वाहतुकीचे नियम 'वेगळ्याच प्रकारे' 'समजावून' सांगितले.

आम्ही फाउंडेशनच्या सर्व महिला राखी बांधून त्यांना त्यांच्या बहिणींची कमी पूर्ण करतो अश्या पद्धतीने या उपक्रमाचे स्वरूप असते, ह्या वेळी वाहतूक पोलीस निरीक्षक श्री संजय पाटील ह्यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व पुरुष पोलीस शिपाई

क्रांतीज्योत महिला विकास फाउंडेशन अध्यक्ष सौ. रूपालीताई शिंदे,*वाहनचालकांना सुरक्षाराखी बांधून वाहतूक नियमांचे पालन करावे, असे सांगून रक्षाबंधन हा साजरा करण्यात आला.




मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आणि एच वी देसाई नेत्र रुग्णालय हडपसर पुणे यांच्या सह कार्याने हवेली तालुक्यात पेरणे गावात घेण्यात येणाऱ्या मोफत नेत्र तपासणी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास शिक्रापूर.तळेगाव ढमढेरे.वाघोली.केसनंद. वाडे बोलाई.लोणीकंद.वढू.भीमा कोरेगाव तसेच वाड्या वस्त्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मधु ताराच्या मोफत नेत्र तपासणी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा लाभ घ्यावा.
मधु तारा प्रमुख
श्री नितीनजी शिंदे.
मधु तारा हवेली तालुका प्रमुख
श्री सदाशिवराव ननावरे.
मधु तारा हवेली तालुका महिला प्रमुख.सौ. स्वरणलताताई ननावरे.

# मनातील ठेकेदाराला काम मिळवून देण्यासाठी दिवा प्रभाग समितीती अधिकाऱ्यांकडून जनतेची पिळवणूक

**.दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत (कल्याण ग्रामिण प्रतिनिधी)**

दि.१२,दिवा(ठाणे):-अभय नगर येथून जात असलेल्या बुलेट ट्रेनच्या कामामुळे अभय नगर येथील रहिवासी भागातून बुलेट ट्रेनच्या मोठमोठ्या गाड्यांचे ये-जा करून येथील रस्त्यावर भरपूर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची अत्यंत वाईट दूरदर्षा झाली आहे. याविषयी येथील रहिवाशी आणि युवक आधार चे प्रतिनिधी तसेच अभय नगर वेल्फेअर सोसायटीचे सचिव रमेश राऊत यांनी शिवसेना शिंदे गटाचे उप विभाग प्रमुख दीपेश पाटील यांच्याकडे ३ जुलै रोजी विनंती करून या रस्त्याची दुरुस्ती करण्याचे शिफारस केली होती शिफारशीचा मान ठेवून दि. ५ जुलै रोजी दीपेश पाटील यांनी या रस्त्याची पाहणी करून दोन दिवसात दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले होते, पण काही वरिष्ठ नेते आणि दिवा प्रभाग समितीतील अधिकारी यांच्या अडकाठी धोरणामुळे हे काम रखडल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर दैनिक युवक आधारचे प्रतिनिधी रमेश राऊत यांनी दिवा प्रभाग समितीचे अधिकारी सचिन भालेराव यांच्याशी संपर्क केला असता या रस्त्याचे नूतनीकरणाचे टेंडर निघाले असून पप्पू दळवी नावाच्या ठेकेदाराच्या कंपनीचे सर्वात कमी टेंडर आले असून आम्ही त्याच्या कंपनीला काम देणार आहोत असे सांगण्यात आले. त्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार त्या ठेकेदाराच्या नावावर अजून पर्यंत वर्क ऑर्डर निघालेली नसल्यामुळे तो रस्त्याची दुरुस्ती करण्यास टाळाटाळ करीत आहे. त्यानंतर रमेश राऊत यांनी सचिन भालेराव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी रमेश राऊत यांचा एकही कॉल उचलला नाही त्यामुळे आत्ता लवकरच ठाणे महानगरपालिकेचे आयुक्तान्सी संपर्क करून दिवा प्रभाग समितीचे अधिकारी सचिन भालेराव यांची लिखित तक्रार करण्याचे ठरविण्यात आले आहे.



दिवा प्रभाग समिती मधील अधिकारी आणि दिव्यातील काही नेतेमंडळी आपल्या मनातील ठेकेदारांना काम मिळून देण्यासाठी आटापिटा करताना बऱ्याच वेळी निदर्शनास आले आहेत. अश्या मुजोर आणि जनतेच्या समस्यांकडे लक्ष न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे.२०० मीटर रस्त्यासाठी जर मोठे नेते आणि अधिकारी एवढी जनतेची पिळवणूक करीत असतील तर ही एक शर्मेची आणि लज्जास्पद बाब आहे.

# राहुल गांधी व इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या अटकेविरोधात यवतमाळात काँग्रेसचे धरणे आंदोलन

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे

यवतमाळ:-लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच इंडिया आघाडीच्या अनेक नेत्यांना अटक करण्यात आल्याच्या निषेधार्थ आज यवतमाळ शहरातील संविधान चौकात तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने धरणे आंदोलन व सरकारविरोधी घोषणाबाजी करण्यात आली.दि. ११ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक करण्यात आली असून,ही कारवाई अलोकशाही,बदलेखोर व दडपशाहीची असल्याचा आरोप काँग्रेसने केला.विरोधी पक्षाच्या नेत्यांचा आवाज दडपण्याच्या प्रयत्नाविरोधात आंदोलनकर्त्यांनी संविधान रक्षणासाठी रस्त्यावर उतरल्याचे सांगितले. आंदोलनानंतर जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्यामार्फत राष्ट्रपती महोदयांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात राहुल गांधी व अन्य नेत्यांवरील अटक तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. तसेच,विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना लोकशाही पद्धतीने चर्चेतून उत्तर देण्याची आणि भविष्यात विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होऊ नये याची हमी देण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा जिल्हा व राज्यभर व्यापक आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला.या आंदोलनात यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगुळकर,शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख,तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश भीसनकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक,कृष्णा पुसनाके जिल्हाध्यक्ष सोशल मिडिया कॉग्रेस,अड.सीमा तेलंगे, अड.जयसिंग चव्हाण,राजू वीरखेडे, कॉ.सचिन मनवर,विजय देवतळे, विक्की राऊत,राजू चांदेकर,जुबेर सय्यद,शुभम शेंडे,ऋषभ गुल्हाने, स्नेहल रेचे,छोटू सवाई,विशाल पावडे, दत्ता हाडके,ओम तिवारी,असमत खान,जरार खान,गंगाधर राऊत, वासुदेव मानकर,अरविंद जाधव, अशोक पुसदकर,कैलास सुलभेवार, नईम पैलवान,किशोर गजभिये, मनोज पाचघरे,विजय मानेकर,शैलेश गुल्हाने आदींसह काँग्रेसचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# लाखो रुपये किमतीच्या १९ मोबाईलचा सिईआयआर पोर्टलव्दारे पनवेल तालुका पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना केले हस्तांतरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

: चोरीस गेलेल्या लाखो रुपये किमतीच्या १९ मोबाईलचा सिईआयआर पोर्टलव्दारे पनवेल तालुका पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना आज हस्तांतरण केले .

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाअंतर्गत सिईआयआर पोर्टचा प्रभावीपणे वापर करून मोबाईल चोरीचा सामाना करण्यासाठी तसेच गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी आणि मोबाईल सुरक्षा वाढवण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात आला होता. त्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाणे, हद्दीतील गहाळ झालेल्या मोबाईलपैकी एकूण 19 मोबाईलचा सिईआयआर पोर्टलव्दारे पनवेल तालुका पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना हस्तांतरण करण्यात आले . पोलीस आयुक्त मिलींद भारंबे,अपर पोलीस आयुक्त, संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 3. पनवेल प्रशांत मोहीते. सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दतील चोरीस / हरविलेले मोबाईल फोन याबाबतची तकार नोंदविण्यासाठी नागरीकांना भारत सरकार व्दारे सिईआयआर पोर्टल सुरू करण्यात आले आहे. पनवेल तालुका पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंद कांबळे, दिलेल्या सुचनाप्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, यांचे मदतीने पोशि भिमराव खत्ताळ यांनी विविध राज्यातुन आतापर्यंत एकुण ९१ मोबाईल फोनची अंदाजे २.६६.०००/- रूपये किंमतीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले आहे.तसेच यापुर्वी सिईआयआर पोर्टल व्दारे ७७ मोबाईल एकुण अंदाजे ९.२४.००० /- रूपये किंमतीचे असे आजपावोतो ९६ मोबाईल अंदाजे किंमत ११.५२.००० /- रूपये किंमतीचे मोबाईल शोधुन मुळ मालकांना परत करण्यात आले आहेत.मोबाईल फोन परत मिळालेल्या नागरीकांनी जनमानसांतील पोलीसांची प्रतिमा उंचावल्याबाबत पोलीस ठाणेकडील सर्व अधिकारी व अंमलदार यांचे नागरीकांनी विशेष उल्लेख करून आभार व्यक्त केले आहेत.



फोटो - मोबाईल केले पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना केले हस्तांतरण